दैनिक अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक

# राष्ट्र सह्याद्री

● संपादक : काकासाहेब नवले ● RNI No. MAHMAR /2019/82605 ● वर्ष ६ वे ● अंक ३२४ ● गुरुवार, ०४ सप्टेंबर २०२५ ● www.rashtrasahyadri.com ● पाने ६ ● मूल्य रु. ४.००

## चॅटजीपीटी अचानक बंद झाल्याने वापरकर्त्यांची अडचण

**मुंबई** : चॅटजीपीटी अचानक बंद झाल्याने जगभरातील वापरकर्त्यांमध्ये गोंधळ उडाला आहे. सोशल मिडियावर अनेकांनी तक्रारी व्यक्त केल्या आहेत. डाउनडिटेक्टरच्या अहवालानुसार, शेकडो वापरकर्त्यांनी अडचणींचा अनुभव घेतला आहे.भारतातील ४३९ हून अधिक वापरकर्त्यांनी समस्यांची नोंद केली आहे. ओपनएआयकडून अद्याप कोणतीही अधिकृत माहिती मिळालेली नाही.जगभरातील चॅटजीपीटी वापरकर्त्यांना अडचणी येत आहेत. अनेक वापरकर्त्यांनी नाराशी तर काहींनी तक्रार सोशल मिडियावर व्यक्त केली आहे.ऑनलाइन सेवा स्थितीचा मागोवा घेणाऱ्या वेबसाइट डाउनडिटेक्टरच्या मते, गेल्या २० ते ३० मिनिटांत शेकडो वापरकर्त्यांनी एआय चॅटबॉटमधील येत असलेल्या अडचणींचा अहवाल समोर आला आहे.चॅटजीपीटीच्या डेव्हलपर ओपनएआयने अद्याप या आउटेजबद्दल कोणतेही अधिकृत माहिती दिलेली नाही.

**विशेष संपादकीय**

## विखे पाटील साहेब... दिलेले आश्वासन पाळावेच लागेल!

मराठा आरक्षणाचा प्रश्न हा गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पटलावर चर्चेचा आणि संघर्षाचा विषय राहिला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा आंदोलनाने या मागणीला नवे आयाम दिले. अलीकडेच मुंबईतील आझाद मैदानातील जरांगे यांचे आमरण उपोषण, मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीने संपले आणि सरकारने जरांगे यांच्या आठ पैकी सहा मागण्या मान्य केल्या. यामुळे मराठा समाजात आनंदाचे वातावरण पसरले; परंतु त्याचवेळी, जरांगे आणि मराठा आंदोलकांची पुन्हा फसवणूक झाल्याची चर्चा देखील सुरू आहे.

या पार्श्वभूमीवर, मराठा आंदोलनाचे यश, अपयश आणि त्याचे सामाजिक परिणाम यांचा आढावा घेणे आवश्यक आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा आंदोलनाने मराठा समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणाला व्यापक व्यासपीठ मिळवून दिले. २ सप्टेंबर २०२५ रोजी सरकारने कुणबी जातीच्या दाखल्यांसाठी नवीन शासकीय निर्णय (जीआर) जारी करण्याची तयारी दर्शवली, ज्यामुळे मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी जातीचे दाखले देण्याची प्रक्रिया सुलभ होणार आहे. याशिवाय, २०२३ आणि २०२४ मधील आंदोलनांदरम्यान दाखल झालेल्या खटल्यांची माघार आणि आत्महत्या केलेल्या मराठा तरुणांच्या कुटुंबियांना नोकरी व आर्थिक मदत देण्याचे आश्वासन सरकारने दिले. हे यश मराठा समाजाच्या दृष्टीने मोठे आहे, कारण यामुळे त्यांच्या मागण्यांना काही प्रमाणात मान्यता मिळाली.जरांगे यांच्या आंदोलनाने मराठा समाजाला एकसंध ठेवण्यात आणि त्यांच्या मागण्यांना राजकीयदृष्ट्या महत्त्व प्राप्त करून देण्यात यश मिळवले. लाखो मराठ्यांनी या आंदोलनात सहभाग घेतला, ज्यामुळे सरकारवर दबाव निर्माण झाला. याशिवाय, जरांगे यांनी सरकारला दोन महिन्यांत जीआर जारी करण्याचे अल्टिमेटम दिले, जे त्यांच्या आंदोलनाच्या तीव्रतेचे आणि दृढनिश्चयाचे द्योतक आहे. बॉम्बे हायकोर्टात मराठा समाजाला कुणबी म्हणून ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्यासाठी हैदराबाद गॅझेटिअरच्या आधारावर केलेली मागणी हा त्यांचा एक महत्त्वाचा कायदेशीर दृष्टिकोन होता.तरीही, या आंदोलनाला पूर्ण यश मिळाले असे म्हणणे घाईचे ठरेल. सरकारने मागण्या मान्य केल्या असल्या, तरी त्या प्रत्यक्षात लागू होणे आणि त्याची अंमलबजावणी होणे हे मोठे आव्हान आहे. मागील आंदोलनांच्या इतिहासावर नजर टाकल्यास, सरकारने अनेकदा आश्वासने दिली; परंतु त्याची पूर्तता करण्यात कमी पडले आहे. जरांगे यांनी स्वतः सरकारच्या वचनभंगाचा मुद्दा उपस्थित केला आहे, आणि त्यामुळे आंदोलकांमध्ये पुन्हा फसवणुकीची भावना निर्माण झाली आहे.याशिवाय, आंदोलनादरम्यान काही ठिकाणी हिंसक वळण आणि मुंबईतील वाहतूक कोंडी यामुळे आंदोलनाला नकारात्मक प्रसिद्धी मिळाली. मुंबई उच्च न्यायालयाने जरांगे यांना आंदोलन मर्यादेत ठेवण्याचे निर्देश दिले आणि काहीवेळा त्यांचे आंदोलन बेकायदेशीर ठरवले गेले. यामुळे आंदोलनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले. तसेच, मराठा आणि ओबीसी समाजांमधील तणाव वाढला, ज्यामुळे सामाजिक सलोख्याला धक्का बसला. (पान २ वर)

# आता फक्त ५ आणि १८ टक्के जीएसटी

**कराचे दोन स्लॅब रद्द; घरे, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि कपडे, चपला स्वस्त होणार**

**पान मसाला, तंबाखू यांसारख्या सिन गुड्स आणि लक्झरी गाड्यांवर ४०% चा नवीन स्लॅब प्रस्तावित**













**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली : देशातील नागरिकांना आणि व्यापाऱ्यांना दिलासा देणारा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून जीएसटी स्लॅबमध्ये मोठा बदल केला आहे. देशातील १२ टक्के आणि २८ टक्क्यांचा स्लॅब रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे आता केवळ ५ टक्के आणि १८ टक्के असे दोनच जीएसटीचे स्लॅब असणार आहेत. त्यामुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह घरंही स्वस्त होणार आहेत. येत्या २२ सप्टेंबरपासून हा निर्णय लागू होणार आहे.**

### सुलभ कररचना
- १२% आणि २८% स्लॅब रद्द.
- १२% मधील ९९% वस्तू आता ५% मध्ये.
- २८% मधील बहुतांश वस्तू १८% मध्ये.
- ऑटोमॅटिक रिफंड सिस्टीम लागू होणार.
- रजिस्ट्रेशन कालावधी १ महिना वरून फक्त ३ दिवसांवर आणला. त्याचा फायदा निर्यातकांना होणार आहे.

### कपडे व पादत्राणे
- २,५०० रुपयांपर्यंतच्या वस्तूंवर जीएसटी आता फक्त ५ टक्के लावण्यात येणार असल्याने कपडे आणि पादत्राणे अशा वस्तू स्वस्त होणार आहेत.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामण यांनी स्वतः पत्रकार परिषद घेऊन या निर्णयांची घोषणा केली. तज्ज्ञांच्या मते, जीएसटीमधील या मोठ्या बदलांमुळे कररचना अधिक सोपी होईल आणि सामान्य नागरिकांवरचा आर्थिक भार कमी होईल.

### दैनंदिन वस्तूंवर सवलत
- पनीर, खाखरा, चपाती, साबण, टूथपेस्ट, शॅम्पू यांसारख्या वस्तूंवरील कर १८% वरून ५% किंवा ०% करण्याबाबत चर्चा.

---

### आरोग्य विमा व जीवन विमा
- ५ लाख रुपयांपर्यंतच्या हेल्थ पॉलिसी व टर्म इन्शुरन्सवर पूर्ण सूट मिळण्याची शक्यता.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी जीएसटी स्लॅबमध्ये बदल झाल्याची माहिती दिली. या निर्णयामुळे देशातील शेतकरी, कामगार, व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना फायदा होणार असल्याचं त्या म्हणाल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदींमुळे हा निर्णय शक्य झाल्याचं सांगत त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले. दिल्लीतील सुषमा स्वराज भवन येथे बुधवारी झालेल्या जीएसटी काउन्सिलच्या मॅरेथॉन बैठकीत कर प्रणालीत मोठा बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. तब्बल १० तासांपेक्षा जास्त चाललेल्या या बैठकीत १२ टक्के आणि २८ टक्केचे स्लॅब पूर्णपणे रद्द करण्यात आले आहेत. नव्या नियमानुसार आता ५ टक्के आणि १८ टक्के असे फक्त दोनच स्लॅब राहणार आहेत. केंद्र सरकारच्या या महत्त्वाच्या निर्णयामुळे व्यापारी तसेच सामान्य नागरिकांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. जीएसटी बैठकीतील प्रमुख निर्णय

## जीआरविरोधात आम्ही कोर्टात जाऊ : भुजबळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



मुंबई : राज्य सरकारने मराठा आरक्षणावर काढलेल्या जीआरवर त्यांचेच मंत्री छगन भुजबळांनी नाराजी व्यक्त केली आहे. ओबीसी कार्यकर्त्यांनी राज्यभर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन द्यावं आणि ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये अशी मागणी करावी असं आवाहन छगन भुजबळांनी केलं.

सरकारच्या या जीआरवर आम्हाला संभ्रम आहे, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत असेल तर त्या विरोधात आम्ही न्यायालयात जाऊ असंही छगन भुजबळ म्हणाले.मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा नवा जीआर काढला. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोष्टीला ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शवला. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांनीही नाराजी व्यक्त केली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीवरही बहिष्कार टाकल्याचं दिसून आलं.

छगन भुजबळ म्हणाले की, या जीआर बाबत अद्याप संभ्रम आहे. याबाबत आमच्या नेत्यांनी आणि अभ्यासकांनी, राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी निवेदनं दिली आहेत. काही ठिकाणी ओबीसी कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केले आहेत. अनेक कायदेतज्ज्ञ, वकील आणि इतरांशी चर्चा करून याची माहिती घेत आहोत. जर आवश्यक असेल तर चर्चा करून येत्या चार दिवसात त्या विरोधात न्यायालयात जाऊ.या जीआरच्या विरोधात न्यायालयात जाण्याची आमची तयारी असून त्यासाठी ज्या कागदपत्रांची जुळवाजुळवी करावी लागेल ती आम्ही करू असं छगन भुजबळ म्हणाले. राज्यातील कार्यकर्त्यांनी त्या-त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना ओबीसींच्या हक्कांवर गदा येऊ देऊ नये अशी निवेदनं द्यावीत. आपले म्हणणे शांतपणे मांडावं. या व्यतिरिक्त जर कुणी उपोषण करत असेल किंवा इतर काही मार्ग पत्करत असेल तर त्या गोष्टी तूर्तास थांबवाव्यात असं भुजबळ म्हणाले.

### भुजबळांची बैठकीला दांडी

मुंबईतल्या मराठा आंदोलनामुळे उडालेली धूळ खाली बसत नाही, तोच आता राज्यभरातील ओबीसी समाज आक्रमक झाल्याचं दिसतंय. यातील सर्वांत मोठे हिरो ठरले ते छगन भुजबळ. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी ते सह्याद्री अतिथीगृहावर पोहोचले खरे, मात्र बैठकीत काही सहभागी झाले नाहीत. राष्ट्रवादीच्या मंत्रिमंडळपूर्व बैठकीला हजेरी लावून ते निघून गेले. त्यांना मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारण्याचं नेमकं कारण विचारण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला खरा, मात्र भुजबळ काहीही न बोलता निघून गेले. त्यामुळे मग ते नाराज असल्याची आणखीनच चर्चा रंगली. तिथून ते थेट भुजबळ नॉलेज सिटीमध्ये पोहोचले आणि त्या ठिकाणी प्रकाश शेंडगेंसह अनेक ओबीसी नेत्यांसोबत त्यांनी चर्चा केली.

## डॅडी अखेर १८ वर्षानंतर तुरुंगा बाहेर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नागपूर** :अंडरवर्ड डॉन अरुण गवळीची नागपूर मध्यवर्ती कारागृहातून सुटका झाली आहे. मागच्या गेटने पोलिसांनी मीडियापासून लपवत अरुण गवळी यांची सुटका केली आहे. अंडरवर्ल्ड डॉन अरुण गवळीची १८ वर्षांनंतर नागपूर तुरुंगातून सुटका झाली आहे, सर्वोच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर केल्यानंतर आज त्यांची सुटका झाली आहे. कुख्यात गँगस्टर अरुण गवळी जामिनावर नागपूरच्या मध्यवर्ती तुरुगातून बाहेर आला आहे. नागपूर पोलिसांनी सुरक्षा व्यवस्थेत अरुण गवळी याला नागपूरच्या डॉ बाबासाहेब आंबेडकर विमानतळ पर्यंत आणले. आता अरुण गवळी विमानाने मुंबईच्या दिशेने रवाना होईल.

## गणरायाच्या विसर्जनाला पावसाची हजेरी, पुणे कोल्हापूरला हायअलर्ट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्याच्या काही भागात पावसाने धुमाकूळ घातला आहे, तर काही भागात विश्रांती घेतली आहे, अशातच राज्यात मंगळवारी मान्सून सक्रिय झाला असून, पुन्हा संपूर्ण राज्यात जोरदार पाऊस सुरू होण्याची शक्यता आहे. ३ ते ५ सप्टेंबरदरम्यान कोकण, मध्य महाराष्ट्राला अतिवृष्टीचा, तर विदर्भ, मराठवाड्याला मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. दरम्यान, पुणे, सातारा आणि कोल्हापूरच्या घाटमाथ्यावर पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरामध्ये सध्या चक्रवाताची स्थिती सक्रिय आहे. पुढील २४ तासांमध्ये वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे, मध्य महाराष्ट्र, कोकण, गोवा किनारपट्टीसह मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. महाराष्ट्रात वाढलेला पावसाचा जोर सप्टेंबरच्या सुरुवातीलाही कायम राहणार आहे. हवामान विभागाने सप्टेंबरमध्ये देशात दीर्घकालीन सरासरीच्या १०९ टक्क्यांपेक्षा जास्त पावसाचा अंदाज वर्तविला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढला आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे राज्यभरात पावसासाठी अनुकूल हवामान झाले असून, ३ सप्टेंबर रोजी कोकण आणि घाटमाथ्यावर मुसळधार पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. त्यामुळे दक्षतेचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. उर्वरित राज्यात काही ठिकाणी विजांसह जोरदार सरींचा अंदाज देण्यात आला असून, सतर्कतेचा यलो अलर्ट लागू आहे.

पुणे जिल्ह्यातील शिवाजीनगर परिसरात मागील २४ तासांत ०.३ मिमी पावसाची नोंद झाली. पुढील २४ तासांत पुण्यात विजांसह (पान ४ वर)

## अभिनेता आशिष कपूरवर बलात्काराचे आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पुणे** : टीव्ही अभिनेता आशिष कपूर याला बलात्काराच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. एका महिलेने आरोप केला आहे की, ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात दिल्लीतील एका हाऊस पार्टीत बाथरुममध्ये त्याने तिच्यावर अत्याचार केला, असे पोलिसांनी सांगितले.डीसीपी (उत्तर) राजा बनथिया यांनी पुण्यात बुधवारी कपूरला अटक झाल्याची खात्री केली. गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपीच्या हालचालींचा माग काढला – आधी गोव्याला आणि नंतर पुण्याला. दोन्ही ठिकाणी पथके पाठवण्यात आली आणि अखेर त्याला अटक करण्यात आली.पोलिसांनी सांगितले की, सुरुवातीला पीडित महिलेने असा आरोप केला होता की कपूर, त्याच्या मित्राने (ज्याने हाऊस पार्टी आयोजित केली होती) आणि इतर दोन अनोळखी पुरुषांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. शिवाय एका महिलेने तिला मारहाण केल्याचाही दावा केला.प्रकरणाचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शींच्या सांगण्यानुसार, पीडित महिला आणि कपूर पार्टीदरम्यान बाथरुममध्ये गेले होते. ते बराच वेळ बाहेर आले नाहीत, तेव्हा त्याचा मित्र आणि इतर पाहुण्यांनी दरवाजा ठोठावला.पोलिसांनी सांगितले की, नंतर त्यांच्यात वाद झाला, जो सोसायटीच्या गेटपर्यंत पोहोचला. पीडितेने आरोप केला की याचवेळी कपूरच्या मित्राच्या पत्नीने तिला मारहाण केली.

## देवेंद्र फडणवीसांचा मराठा आरक्षणात सिंहाचा वाटा

**लक्ष्मण हाकेंनी अतिशहाणपणा करु नये : ना.विखे**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई** : राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भात नवा शासन आदेश जारी केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानातील आपले आंदोलन थांबवले होते. राज्य सरकारने आपल्या बहुतांश मागण्या मान्य केल्या आहेत. उर्वरित मागण्या या पुढील कालावधीत पूर्ण होतील. त्यामुळे आपण मराठा आरक्षणाची लढाई जिंकलो आहोत, असे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी आपले उपोषण सोडले होते. मात्र, राज्य सरकारच्या नव्या जीआरमुळे मराठा आरक्षणाबाबत कोणताही फायदा होणार नाही, असे मत मराठा आरक्षणासाठी दीर्घकाळ लढा देणाऱ्या विनोद पाटील यांनी मांडले होते. विनोद पाटील यांच्या या वक्तव्याचा मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी समाचार घेतला. ते बुधवारी मुंबईतील पत्रकार परिषदेत बोलत होते.

मराठा आरक्षणासंदर्भात यापूर्वी अनेक मराठा समाजाच्या लोकांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. खरं तर या वेगवेगळ्य विचार प्रवाहांमुळे मराठा आरक्षणाचा संघर्ष कमकुवत झाला होता. सरकारने आता एक पाऊल पुढे टाकले आहे. तर हे सगळे पुढे कसे जील, याचा विचार सगळ्यांनी केला पाहिजे. इतकी वर्षे वेगवेगळे मतप्रवाह ठेवून आपल्याला आरक्षणाच्या लढाईत यश मिळालं का? नाही मिळालं, (पान ४ वर)

## प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन केले तरी सामाजिक सलोखा टिकेल : सुधीर तांबे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : राजकीय किंवा व्यक्तिगत स्वार्थासाठी सामाजिक धार्मिक विष पेरणारी लोक समाजात वाढत आहेत. सामान्य माणसाच्या मनात कुठलीही द्वेष भावना नसते. ते माणुसकीच्या नात्याने एकोप्याने जगतात. प्रत्येकाने किमान आपल्या धर्माचे पालन केले तरी सामाजिक सलोखा टिकेल, कारण कुठलाही धर्म दुसऱ्याचा द्वेष करायला शिकवत नाही. भूतदया आणि करुणा हीच प्रत्येक धर्माची शिकवण आहे. धर्म संस्थापक हे धर्म सुधारक आहेत, त्यांच्या शिकवणुकीचे आपण तंतोतंत पालन करायला हवे, असे आवाहन माजी आमदार सुधीर तांबे यांनी केले.



छाया : प्रदीप आहेर

येथील शासकीय विश्रामगृहात मानवता संदेश फाउंडेशन व जिल्हा उर्दू साहित्य परिषदेच्या वतीने इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित महंमद पैगंबर यांच्या जीवनावर आधारित ग्रंथाचे वाटप करण्यात आले. यावेळी डॉ. तांबे बोलत होते. नॅब संस्थेचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ भागचंद चुडीवाल कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. आमदार हेमंत ओगले, माजी नगराध्यक्ष अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, अशोक कारखान्याच्या संचालिका मंजुश्री मुरकुटे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंत जोशी, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. शिक्रे, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी यावेळी उपस्थित होते.

माजी. आ. डॉ. सुधीर तांबे म्हणाले, हजरत महंमद पैगंबर यांचे संपूर्ण जीवन आदर्श आहे. कुठलाही धर्म दुसऱ्याचा द्वेष शिकवत नाही. पण आज स्वार्थापोटी द्वेष पसरवणारे अतिशय वेगात कामाला लागले आहे. त्यामुळे आता समाजात वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी समाजाला जागरूक करण्यासाठी आणि भारताच्या संविधानानुसार जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. आपण प्रत्येकाने सामाजिक जबाबदारी पाडून पसरवली जाणारी जातीय किंवा धार्मिक कटूता कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ चुडीवाल, अनुराधा आदिक, मंजुश्री मुरकुटे, करण ससाणे, शहर काजी सय्यद अकबर अली यांची भाषणे झाली. प्रारंभी आयोजकांच्या वतीने मानवता संदेश फाउंडेशन चे अध्यक्ष सलीम खान पठाण यांनी प्रास्ताविकातून उपक्रमाची सविस्तर माहिती दिली. विधीज्ञ समीन बागवान यांनी सूत्रसंचालन केले.

कार्यक्रमाला माजी प्राचार्य टी ई शेळके, प्रवासी संघटनेचे अध्यक्ष रणजीत श्रीगोड, लकी सेठी, अशोक उपाध्ये, जीवन सुरुडे, ज्येष्ठ पत्रकार मारुती राशिनकर, माजी उपनगराध्यक्ष अंजुम शेख, मुक्तार शहा, डॉ. सलीम शेख, सलीम जहागीरदार, सुनील साळवे, यांच्यासह विविध पक्षातील सर्वधर्मीय पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी नजीर भाई शेख, खालिद मोमीन, तन्वीर शेख, विधीज्ञ वाय. के. शेख, डॉ. अफराज तांबोळी, फिरोज पठाण, मोहम्मद शेख, फय्याज पठाण, बबलू काझी, हारुण अब्दुल्लाह, मुदस्सर शेख आदींनी प्रयत्न केले.

## संपादकीय..

(पान १ वरुन )

# विखे पाटील साहेब...
## दिलेले आश्वासन पाळावेच लागेल!

मराठा आंदोलनाचे सामाजिक परिणाम सखोल आणि बहुआयामी आहेत. एकीकडे, या आंदोलनाने मराठा समाजाला त्यांच्या हक्कांसाठी लढण्याची प्रेरणा दिली आणि सामाजिक जागृती निर्माण केली. मराठा समाजातील तरुण आणि शेतकरी, जे दुष्काळ, कर्ज आणि आर्थिक संकटांनी ग्रासले आहेत, त्यांना या आंदोलनाने आशेचा किरण दाखवला. परंतु, दुसरीकडे, मराठा आणि ओबीसी समाजांमधील वाढता संघर्ष हा चिंतेचा विषय आहे. मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्याच्या मागणीमुळे ओबीसी नेत्यांनी तीव्र विरोध केला आहे, ज्यामुळे सामाजिक तेढ वाढण्याची शक्यता आहे.

आंदोलनामुळे महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांवरही परिणाम झाला आहे. मनोज जरांगे यांनी मराठा समाजाच्या उमेदवारांना विधानसभा निवडणुकीत उतरवण्याचा निर्णय घेतला, ज्यामुळे महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही राजकीय गटांना नुकसान होण्याची शक्यता आहे. यामुळे मराठा समाजाचे राजकीय सामर्थ्य वाढले असले, तरी जातीआधारित राजकारणाला खतपाणी मिळण्याचा धोका आहे.

मराठा आंदोलनाने मराठा समाजाच्या मागण्यांना व्यापक व्यासपीठ मिळवून दिले आणि सरकारला काही मागण्या मान्य करण्यास भाग पाडले; परंतु त्याची पूर्ण अंमलबजावणी आणि कायदेशीर वैधता ही भविष्यातील आव्हाने आहेत. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मध्यस्थीने आंदोलन तात्पुरते थांबले असले, तरी मराठा समाजाचा सरकारवरील विश्वास पुन्हा प्रस्थापित करणे हे सरकारचे सर्वात मोठे आव्हान आहे. आंदोलनाने सामाजिक जागृती निर्माण केली; परंतु त्याचवेळी सामाजिक सलोख्याला धक्का लावला. मराठा आरक्षणाचा प्रश्न हा केवळ कायदेशीर लढा नसून, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांचा गुंता आहे. यापुढे सरकारने ठोस पावले उचलून आणि सर्वसमावेशक धोरण मराठा समाजाला न्याय देण्याची गरज आहे, अन्यथा हा प्रश्न भविष्यात आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता मंत्रिमंडळ उपस समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांची ही जबाबदारी आहे की शासनाने दिलेले आश्वासन पाळायलाच हवे. मुख्यमंत्री महोदयांना ते आश्वासन पूर्ण करण्यासाठी विखे पाटलांनी उद्युक्त करायला हवे. अन्यथा त्याचे परिणाम शासनालाच नव्हे तर सबंध समाजाला भोगावे लागतील.

## रांजणगाव सोसायटीच्या चेअरमनपदी नवनाथ वर्पे तर व्हा. चेअरमनपदी मीना देशमुख

कोपरगाव : तालुक्यातील रांजणगाव विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदाची निवड अलीकडेच मोठ्या उत्साहात पार पडली. ही निवड एस.पी. रुद्राक्ष साहेब, दुय्यम सहाय्यक निबंधक, कोपरगाव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या निवडीत कोल्हे गटाचे नवनाथ भास्कर वर्पे यांची चेअरमनपदी तर सौ. मीना विजय देशमुख यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेसाठी सोसायटीचे सर्व संचालक उपस्थित होते. तसेच माननीय कैलासराव रहाणे (माजी भाजपा तालुका अध्यक्ष), प्रकाश गोरडे, सरपंच गजानन मते, उपसरपंच त्रिंबक रामभाऊ वर्पे, नानासाहेब वर्पे, सचिन खालकर, अनिल खालकर, संपत लक्ष्मण खालकर, अरुण वर्पे, धनंजय वर्पे, विलास वामन, अशोक विधे, गणेश खालकर, गीताराम वर्पे, दत्तात्रय वर्पे, दत्ता कोठाळे, प्रशांत भुजगे, सुशांत ठोंबरे, भगवान ठोंबरे, राजेंद्र ठोंबरे, बापूसाहेब ठोंबरे, सुनील रणधीर, बाबासाहेब गुडघे, सोमनाथ वर्पे, रामनाथ साने, राजू दिघे, श्रावण खालकर, वीरेंद्र वर्पे, संतोष वर्पे, राहुल वर्पे आदीसह कोल्हे गटाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



# सांस्कृतिक अविष्कारातून सामाजिक प्रबोधन हाच प्रवरेचा मानस : डॉ. सुस्मिता विखे पाटील



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सात्रळ** : अध्ययन-अध्यापनाला अभ्यासेत्तर उपक्रमांची जोड दिल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होते. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी व सांस्कृतिक अविष्कारातून सामाजिक प्रबोधन घडण्यासाठी प्रवरा कायमच प्रयत्नशिल आहे असे प्रतिपादन प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या मुख्यकार्यकारी अधिकारी डॉ.सुस्मिता विखे पाटील यांनी केले. पाथरे येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयांच्या प्रांगणात सात्रळ पाथरे ग्रामस्थ आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था,लोणी यांच्या वतीने आयोजित प्रवरा सांस्कृतिक महोत्सव २०२५ च्या शुभारंभ प्रसंगी डॉ.विखे पाटील बोलत होत्या. यावेळी संस्थेच्या शिक्षण संचालिका . लीलावती सरोदे, आश्वी कॉलेजचे कॅम्पस संचालक डॉ. महेश खर्डे, संस्थेचे संचालक ॲड. आप्पासाहेब दिघे , शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष आबासाहेब घोलप, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष ॲड. बाळकृष्ण चोरमुंगे, ॲड. पोपटराव वाणी, रमेश पन्हाळे, उमेश घोलप, अशोक पाटील घोलप, अबरार घोणे, अण्णासाहेब कडू , जयवंत जोर्वेकर, सुभाष अंत्रे, भास्कर पाटोळे, आरिफभाई शेख, शिवाजी घोलप, सुरेश घोलप, पत्रकार अनिल वाघचौरे, संदीप गावडे, प्राचार्य डॉ. सोपान शिंगोटे, प्रवरा सिद्धिविनायक गणेश महोत्सव- सात्रळ क्लस्टरचे प्रमुख समन्वयक के. बी. बारगजे,डॉ. रामदास बोरसे, मुख्याध्यापक अर्चना प्रधान, . भाग्यश्री साबळे, प्रभाकर सांगळे, तुपे, एस. डी. कुटे आदी उपस्थित होते.यांच्यासह विविध शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून साकारलेला आणि विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांचे जीवन आणि 'थिंक ग्लोबली, ॲक्ट लोकली' हे आशयसूत्र मध्यवर्ती ठेवून संपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी लकी ड्रॉ सोडत पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, समस्त ग्रामस्थ, सरपंच यांच्या शुभहस्ते करण्यात आली. पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी विविध बक्षिसे जिंकली, त्याप्रसंगी विजेत्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसांडून वाहत होता. प्रवरा सांस्कृतिक महोत्सवामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि वरिष्ठ महाविद्यालय अशा एकूण १५ शाळांचे १८ सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण झाले. यामध्ये एकूण ५२४ कलाकारांनी सक्रिय सहभाग नोंदवला. गणेश वंदन, महाराष्ट्राची लोकधारा, मिशन सिंदूर, देशभक्तीपर गीते, भक्ती गीते, सामाजिक प्रबोधन करणाऱ्या नाटिका, पारंपरिक लोकगीत, मंगळागौरी योगा गीत, लेझीम, पावलीच्या माध्यमातून मराठी भाषा, संस्कृती आणि मराठी अस्मितेचा जागर विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या उत्साहात सप्रयोग सादर केला. जिल्हा परिषद गटामधून जिल्हा परिषद प्राथमिक विद्यालय दिघे वस्ती, धानोरे, तसेच माध्यमिक विभागातून श्री छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय पाथरे बुद्रुक तर वरिष्ठ महाविद्यालय गटातून कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सात्रळ या शाळा-महाविद्यालयांच्या संघानी विभागनिहाय प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. प्राचार्य राजेश माघाडे व प्रा. डॉ. प्रवीण तुपे यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. नवनाथ शिंदे व राधाकृष्ण कोहाळे यांनी केले. आभार डॉ. संदीप म्हस्के यांनी मांनले. सर्वच सांस्कृति कार्यक्रम शांततेत पार पडले. श्रोत्यांनी कार्यक्रमास मनापासून दाद दिली. पंचक्रोशीतील ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक, पालक, रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या
## 'वाजवेल तो गाजवेल' ढोल ताशा वादन स्पर्धा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : संजीवनी युवा प्रतिष्ठान आयोजित भव्य ढोल-ताशा स्पर्धा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर मैदान, कोपरगाव येथे मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडली.या स्पर्धेत मुंबादेवी तरुण मंडळाने प्रथम क्रमांक, तुळजा भवानी ढोल ताशा पथकाने द्वितीय क्रमांक, हिंदूवाडा मंडळाने तृतीय क्रमांक तर हत्ती गणपती मंडळाने चतुर्थ क्रमांक पटकावला. सर्व विजेत्या पथकांचे अभिनंदन करून संजीवनी युवा प्रतिष्ठानचे संस्थापक विवेकभैय्या कोल्हे यांनी सर्व पथकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.विजेता तरुण मंडळ,शिवराय तरुण मंडळ,प्रगत शिवाजी रोड सयुंक्त तरुण मंडळ, छत्रपती प्रतिष्ठान यांनीही मोठ्या उत्साहात सहभाग घेत चांगले वादन केले याबदल त्यांचेही कौतुक करण्यात आले. प्रारंभी स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी प्रसिद्ध व्यापारी सुरेश विसपुते, कोपरगाव शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रामकृष्ण कुंभार, पोलिस उपनिरीक्षक सोन्ने , अमृत संजीवनीचे चेअरमन पराग संधान, कोल्हे कारखाना संचालक बाळासाहेब वक्ते, संचालक रमेश घोडेराव, कलावंत ढोल ताशा पथक पुणे वादक रितेश माने, मनोज विसपुते, उत्तमराव मते आदीसह विविध मान्यवर उपस्थित होते. स्पर्धेसाठी विकास किर्लोस्कर व कृष्णा कोळपकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. या भव्य स्पर्धेत शहरातील तसेच ग्रामीण भागातील अनेक ढोल-ताशा पथकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. शेकडो तरुण-तरुणींनी पारंपरिक वेशभूषेत, शिस्तबद्ध पद्धतीने सादर केलेल्या अद्वितीय तालांनी संपूर्ण मैदान दणाणून टाकले. ढोल-ताशांच्या गजराने कोपरगाव शहर दुमदुमून गेले. प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सोहळ्याचा मनमुराद आनंद घेतला. स्पर्धेचे मुख्य उद्दिष्ट तरुणाईमध्ये संस्कृती, परंपरा आणि एकता यांचे संवर्धन करणे हे होते. आपल्या संस्कृतीचा उज्ज्वल इतिहास जपत, पुढील पिढ्यांपर्यंत त्याची ओळख पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांची आजच्या काळात नितांत आवश्यकता असल्याचे विवेकभैय्या कोल्हे यांनी सांगितले. कोपरगावकरांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवून एकतेचे आणि संस्कृतीप्रेमाचे दर्शन घडवले. सर्व पथकांनी उत्कृष्ट वादन सादर केले. वाद्यसंस्कृती टिकून राहावी आणि ऐक्य, संघटन यासारख्या गुणांना प्रोत्साहन मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संजीवनी युवा प्रतिष्ठान अशा उपक्रमांचे आयोजन करत असल्याचे कोल्हे यांनी स्पष्ट केले.या प्रसंगी वाद्यप्रेमी कोपरगावकर, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्री 'गणेश' कारखान्याच्या कामगारांची देणी अदा
## विवेक कोल्हेंनी गणेश कर्मचाऱ्यांना दिलेला शब्द केला पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव:** श्री गणेश सहकारी साखर कारखान्याने कामगार बांधवांचा दीर्घकाळ प्रलंबित देणी असलेला प्रश्न युवा नेते विवेक कोल्हे यांनी मार्गी लावत मोठा दिलासा दिला आहे. कारखान्याच्या स्थापनेपासून कामगारांनी केलेल्या योगदानाची दखल घेत १९८८ पासून थकीत असलेली देणी व २०१७ पासून निवृत्त कर्मचाऱ्यांची देणी, तसेच कार्यरत कर्मचाऱ्याची देणी अदा करण्यात आली असून कामगारांना यामुळे दिलासा मिळाला आहे. यासह २०१७ पासून निवृत्त झालेल्या कामगारांची मिळून तब्बल ६ कोटी ६५ लाख रुपयांची थकबाकी रक्कम मंजूर करून देण्यात आली आहे. प्रोव्हिडंट फंड आणि ग्रॅज्युटी,फरक,थकीत पगार या थकबाकीचा निपटारा झाल्यामुळे पाचशे कार्यरत कर्मचारी व दोनशे सेवानिवृत्त कर्मचारी यांना दिलासा मिळाला आहे. त्यामुळे कामगारांच्या आयुष्यात नवी ऊर्जा निर्माण झाली असून हा प्रश्न मार्गी लावल्याबद्दल त्यांनी गणेश कारखान्याचे मार्गदर्शक व जिल्हा बँकेचे संचालक, युवानेते विवेक कोल्हे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. या प्रसंगी बोलताना विवेकभैय्या कोल्हे म्हणाले की, कामगार बांधवांचे प्रश्न सुटले पाहिजेत, यासाठी कारखाना सुरळीत चालणे आवश्यक आहे. ही भूमिका ठामपणे मांडत आम्ही अनेक निर्णय घेतले आणि त्यातून बहुतांशी प्रश्न मार्गी लागले आहेत. उर्वरित प्रश्न सोडवण्यासाठीही आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत.सहकार चळवळ टिकवण्यासाठी शेतकरी सभासद, कारखाना कर्मचारी आणि संचालक मंडळ या तिहेरी ऐक्याची आवश्यकता असते. या ऐक्यामुळेच गणेश सहकारी साखर कारखान्याची गाडी सुरळीत धावते आहे. कामगारांची थकीत देणी देण्यासाठी आम्ही कटिबद्ध होतो, त्यावेळी जो विश्वास दिला होता त्याची फलश्रुती आज प्रत्यक्षात दिसून आली आहे. कामगारांच्या थकीत प्रश्नांची उकल आणि निवृत्त कर्मचाऱ्यांच्या देणगीची वेळेत सोडवणूक यामुळे गणेश कारखाना हा केवळ उत्पादनकेंद्र न राहता कामगारांचे खरे आश्रयस्थान असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

# बेलापूर सोसायटीच्या चेअरमनपदी किशोर नवले बिनविरोध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी किशोर शंकरराव नवले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. संस्थेचे दिवंगत चेअरमन विलासनाना मेहेत्रे यांची पंधरा दिवसांपूर्वी संस्थेच्या चेअरमन पदी निवड करण्यात आली होती. परंतु त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्या रिक्त जागी किशोर नवले यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली. कुठल्याही गाजावाजा न करता व हारतुरे न घेता साधेपणाने ही निवड करण्यात आली. यावेळी निवडणूक अधिकारी म्हणून रवींद्र जाधव व संस्थेचे सचिव विजय खंडागळे यांनी काम पाहिले. यावेळी आयोजित पदाधिकारी निवडीच्या बैठकीला संस्थेचे माजी चेअरमन,ज्येष्ठ संचालक व श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती सुधीर पा.नवले, जनता आघाडीचे अध्यक्ष रवींद्र खटोड, ज्येष्ठ संचालक अरुण पा. नाईक, माजी सरपंच भरत साळुंके, विद्यमान व्हा. चेअरमन अन्तोन अमोलिक,शेषराव पवार, शिवाजी पा. वाबळे, राजेंद्र सातभाई, अशोक कुहे ,विश्वनाथ गवते, पंडितराव बोंबले, सविताताई मेहेत्रे हे संचालक उपस्थित होते. तसेच यावेळी सुधाकर रावसाहेब खंडागळे, दत्तात्रय कुहे,काशिनाथ गाढे, अनिल नाईक , ऐनतपुरचे चेअरमन चंद्रकांत पा.नाईक,बाळासाहेब लगे, अनिल नवले, सोपानराव खोसे, महेश नवले, प्रदीप नवले,विकास ताम्हणे अय्याजभाई सय्यद, जाकीर शेख, संजय नवले,चांगदेव कुताळ, शिवाजी नवले, किरण शेळके, ज्ञानेश्वर शेळके,भरत नवले, प्रकाश कु-हे, भाऊसाहेब वाबळे विष्णुपंत डावरे, संजय भोडगे, विक्रम पा. नाईक, रंगनाथ नवले,अविनाश नवले, सौरभ पवार यांच्यासह सभासद हितचिंतक यावेळी उपस्थित होते.



## मुळा कारखाना विद्यालयात पर्यावरण पूरक गणेश विसर्जन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर माध्यमिक विद्यालय मुळा कारखाना विद्यालयात आज पर्यावरण पूरक पद्धतीने गणेशाचे विसर्जन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक व्यंकटेश बेल्हेकर यांच्या हस्ते गणरायाची आरती करून गणरायाला निरोप देण्यात आला. इयत्ता नववीचे विद्यार्थी व वर्गशिक्षक शिंदे आर एस यांनी शालेय मैदानावर सुंदर असे फुलांनी सजवलेले पात्र तयार केले व गणपती विसर्जनाचे नियोजन केले. विद्यार्थ्यांनी रांगोळी काढून सुंदर अशी सजावट केली. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या वतीने प्रसाद देण्यात आला. विद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना आपल्या घरच्या गणपतीचे अशाच पद्धतीने पर्यावरण पूरक पद्धतीने गणराया विसर्जन करण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. सर्वत्र प्रदूषण मोठ्या प्रमाणात झाल्याने सर्वांनी पर्यावरण मुक्त व मानवाला कोणतेही हानी पोहचणार नाही, याची यापुढे काळजी घेण्याची गरज असल्याचे मुख्यध्यापक, बेल्हेकर यांनी सांगितले.

## 'साई संस्थान'ला होंडा शाईन भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबांवरील अतुट विश्वास व श्रद्धेपोटी श्रद्धा मोटर्स, कोपरगांव यांनी साईबाबा संस्थानला यापुर्वी ०३ दुचाकी मोटारसायकल देणगी स्वरुपात दिलेल्या आहेत. त्याच प्रमाणे आजही दि. ०३ सप्टेंबर २०२५ रोजी श्रद्धा मोटर्स, कोपरगांव यांनी श्री साईबाबा संस्थान एक होंडा शाईन १०० डी एक्स भेट स्वरूपात दिली आहे . संस्थानच्या वतीने विधीवत पुजा करण्यात आली. यावेळी देणगीदार साईभक्तांनी सदर वाहनाची चावी श्री साईबाबा संस्थानचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांचेकडे सुपुर्द केली. त्यानंतर देणगीदार साईभक्तांचा संस्थानचे वतीने उप मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सत्कार केला. यावेळी श्रद्धा मोटर्सचे एरिया इनचार्ज स्वप्नील जवारकर, झोनल मॅनेजर जेसल फर्नांडीस व महम्मद अन्वर हुसेन व डिलर विशाल सरोदे तसेच संस्थानचे प्रशासकिय अधिकारी संदिपकुमार भोसले, वाहन विभाग प्रमुख अतुल वाघ आदी उपस्थित होते.

# विविध प्रश्नांबाबत व्यापाऱ्यांनी घेतली आमदार सत्यजित तांबे यांची भेट
## चुकीच्या पद्धतीने व्यापाऱ्यांना विनाकारण त्रास देऊ नका : आ. सत्यजित तांबे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : - लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्याची बाजारपेठ फुलली आहे. प्रामाणिकपणा हे आपल्या बाजारपेठेचे वैशिष्ट्य राहिले आहे. शहर व तालुक्याच्या विकासात व्यापाऱ्यांचे योगदान आहे. एखादा चुकत असेल तर सांगा .मात्र गुणवत्तेच्या नावाखाली व्यापाऱ्यांना त्रास देणे ही संगमनेर तालुक्याची संस्कृती नाही. त्यामुळे चुकीच्या पद्धतीने व्यापाऱ्यांना कुणीही त्रास देऊ नका असे आवाहन आमदार सत्यजित तांबे यांनी केले आहे.इंदिरानगर येथील निवासस्थानी संगमनेर व्यापारी असोसिएशनच्या वतीने आमदार सत्यजित तांबे यांना शहर मधील व्यापाऱ्यांनी विविध अडचणींबाबत व अपप्रचार आणि त्रास देणाऱ्यांबाबत निवेदन दिले यावेळी उद्योगपती राजेश मालपाणी, अध्यक्ष योगेश कासट, ओंकार शेठ भंडारी, सुमेध संत, शरद गांडोळे ,अरुण शहरकर, जुगल किशोर बाहेती, प्रकाश राठी, मकरंद राहतेकर, संतोष कारले, गुरुनाथ बापते, मुकेश कोठारी, शैलेश मालानी, विलास दिवटे, विश्वनाथ असावा, विशाल पडतानी, अभय नेहुलकर ,गुलाब शहा, रुपेश राहतेकर , निखिल गुंजाळ आदींसह विविध व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे की,संगमनेर शहरातील गुळ पॅकिंग व अन्य व्यावसायिकांच्या विषयी काही लोक अपप्रचार करून संगमनेर मधील व्यापाऱ्यांची बदनामी करत आहेत. सदर गुळाचे नमुने हे अन्न व औषध प्रशासन अहिल्यानगर यांच्याकडून तपासणी करून घेतले असून हा गूळ प्रामाणिक झाल्याचे सिद्ध सुद्धा झाले आहे. मात्र तरीही काही लोक व्यक्तिगत स्वार्थासाठी व्यापाऱ्यांना त्रास देत असल्याने समस्त व्यापाऱ्यांनी आमदार सत्यजित तांबे यांची भेट घेतली.यावेळी आमदार सत्यजित तांबे म्हणाले की, शहराच्या व तालुक्याच्या विकासात व्यापारी बांधवांनी योगदान दिले आहे. मागील काही काळापासून क्वालिटीच्या नावाखाली काही मंडळी व्यापाऱ्यांना ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न करत आहे. जे प्रामाणिक काम करत असतील त्यांना चुकीच्या मार्गाने त्रास देणे अडचणीत आणणे हे अत्यंत दुर्दैवी आहे . एखादा व्यापारी चुकत असेल तर त्याच्याविरुद्ध आवाज उठवला पाहिजे. परंतु चूक नसताना व्यक्तिगत स्वार्थासाठी विनाकारण त्रास काही मंडळी देत आहेत. त्यांना कधीही पाठीशी घालणार नाही. याचबरोबर सदर मालाची तपासणी शासकीय यंत्रणा करत असते .त्यांच्या कडून प्राप्त झालेल्या अहवालावरही संशय व्यक्त करणे आणि त्रास देणे हे अत्यंत चुकीचे आहे. व्यापारी बांधवांनी प्रामाणिकपणाच्या मार्गाने एकजुटीने लढावे आपण व्यापाऱ्यांच्या पाठीशी आहोत असे ते म्हणाले. तर राजेश मालपाणी म्हणाले की ठराविक काही लोक मुद्दाम व्यापाऱ्यांना अडचणीत आणण्यासाठी खोटेनाटे कागदपत्र करून ब्लॅकमेल करत आहेत .याविरुद्ध सर्वांनी आमदार सत्यजित तांबे व प्रांताधिकारी यांच्याकडे दाद मागितली आहे. आमदार तांबे यांनी याबाबत व्यापाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे अस्वस्थ केले असून कुणी चुकीच्या मार्गाने त्रास देतच असेल तर सर्व व्यापारी एकत्र येऊन अशा प्रवृत्ती विरुद्ध लढा देतील असे ते म्हणाले. तर यावेळी जमलेल्या विविध व्यापाऱ्यांनी संगमनेर शहरामध्ये सध्या असलेल्या अशांतता आणि असुरक्षित याबाबत चिंता व्यक्त केली यापूर्वी असे वातावरण कधीही नव्हते असेही अनेक व्यापाऱ्यांनी म्हटले आहे.



# 'ईद-ए-मिलाद' ची उद्या मिरवणूक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** - प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर साहेब यांचा जन्मदिन ईद-ए-मिलाद म्हणून जगभरात साजरा केला जातो .या निमित्ताने उद्या शुक्रवारी ईद-ए-मिलादुन्नबी ची मिरवणूक सकाळी ८.३० वाजता जामा मशिदीच्या प्रांगणातून काढण्यात येणार असल्याची माहिती जामा मशिदीचे खतीब व ईमाम हजरत मौलाना मोहम्मद इमदादअली यांनी दिली. सालाबाद प्रमाणे सदरची मिरवणूक सकाळी निघाल्यानंतर वॉर्ड नंबर दोन, मिल्लत नगर,फातिमा कॉलनी व नेहमीच्या परंपरागत मार्गावरून पुन्हा जामा मशिदीत येईल.त्या ठिकाणी मिरवणुकीची सांगता होईल. त्यानंतर शुक्रवारची साप्ताहिक नमाज होईल. जुमा नमाज नंतर हजरत पैगंबरांच्या पवित्र केसाचे दर्शन करविण्यात येईल .त्याच वेळी जामा मशिदीच्या हॉलमध्ये महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे .तरी या सर्व कार्यक्रमांना सर्व मुस्लिम बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन जामा मशीद ट्रस्ट व शहरातील सर्व मशिदींचे ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे .पैगंबर जयंतीचा उत्सव साजरा करण्यासाठी शहरातील अहले सुन्नत वल जमात च्या सर्व मशिदींचे मौलाना, प्रमुख कार्यकर्ते, विविध तरुण मंडळे प्रयत्नशील आहेत. तरी पैगंबर जयंतीची मिरवणूक व इतर सर्व धार्मिक कार्यक्रमात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन ही मौलाना मोहम्मद इमदादअली व शहरातील सर्व मशिदींचे प्रमुख धर्मगुरू यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, Emal ID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## उद्या श्रीरामपुरात शेती महामंडळ कामगारांचा मेळावा

**शिरसगाव** : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ कामगार यांचा भव्य मेळावा दिनांक ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कामगार सदन श्रीरामपूर येथे आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती सुभाष कुलकर्णी यांनी दिली. ज्या कामगारांनी सन २००८ ते २०११-१२ कालावधीत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे पगार घेतला आहे त्या कामगारांना चार वर्षाचा बोनस ८.३३% दराने मिळणार आहे.त्याची माहिती दिली जाणार आहे.शेती महामंडळ ते पेमेंट चेकने अथवा ऑनलाईन पद्धतीने देणार आहेत त्याचा विचार येथे होईल तसेच जे कामगार बोनसला पात्र आहेत त्याची यादी वाचून दाखविली जाईल तसेच दिनांक २५ ऑगस्ट रोजी महसूल मंत्री ना.चंद्रकांत बावनकुळे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे ,महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्या समवेत बैठक झाली.त्या बैठकीत २ गुंठे जागा व घर बांधून देणेबाबत ,समान कामास समान वेतन देणे,सेवा उपदान देणे,४ था पाचवा वेतन आयोग फरक यासाठी चर्चा झाली. यावर २ ऑक्टोबर पर्यंत निर्णय न झाल्यास नियोजित कार्यक्रमाप्रमाणे पुणे मुख्य कार्यालयासमोर उपोषण,आंदोलन करण्यात येणार आहे,प्रत्येक मळ्याचे कामगार दोन दिवस असे २८ दिवस आंदोलन राहील. तसेच दिनांक ७ सप्टेंबर रोजी साकरवाडी व दिनांक ८ सप्टेंबर रोजी चांगदेव मळ्यावर मेळावा घेण्यात येणार आहे.त्याची सविस्तर माहिती देणार आहेत.मेळाव्यास कामगार नेते अविनाश आपटे,सुभाष कुलकर्णी,ज्ञानदेव आहेर, वेणुनाथ बोळींज, ,उत्तमराव राजगुडे,बाबासाहेब बोर्डे,हे उपस्थितीत राहणार आहेत.मेळाव्यास उपस्थित राहण्याचे आवाहन अशोक पाटील भालचंद्र कोल्हटकर आदींनी केले आहे.

## नारायण गाडेकर यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर



**कोपरगाव** : सोमैया विद्या विहार संचलित श्री शारदा इंग्लिश मिडीयम स्कूलचे ज्येष्ठ विज्ञान शिक्षक नारायण रामभाऊ गाडेकर यांना यंदाचा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. स्व पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, निमगाव बागा यांच्या वतीने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. येत्या ५ सप्टेंबर, शिक्षक दिनानिमित्त प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गाडेकर यांना हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. गाडेकर मागील ३३ वर्षांपासून अखंडपणे शैक्षणिक, सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात कार्यरत आहेत. विज्ञान विषयाच्या अध्यापनात त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना प्रेरित केले असून महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विज्ञान विषय मॉडरेटर म्हणूनही त्यांनी महत्त्वाची जबाबदारी पार पाडली आहे. या सन्मानाबद्दल प्राचार्य के. एल. वाकचौरे, उपप्राचार्य शुभांगी अमृतकर, पर्यवेक्षिका प्रज्ञा पहाडे, पल्लवी ससाणे, नैथालिन फर्नांडिस यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

# कमी दराने काम घेऊनही ठेकेदाराने कमवले १ कोटी ४२ लाख!

## घोडेगाव परिसरातले खड्डे 'जैसे थे'च!



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : 'सरकारी काम अन् दहा वर्षे थांब' अशा परिस्थितीत पायाभूत सुविधांची कामं सुरु असताना सरकार दरबारी मात्र 'आंधळं दळतंय अन् कुत्रं पीठ खातंय', असंच निराशाजनक चित्र पाहायला मिळत आहे. अशातच सध्या मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर सरकारी पातळीवर कमालीचा गोंधळ पहायला मिळत आहे. अशा या विचित्र परिस्थितीत भरीस भर म्हणून अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर महामार्गवर सर्वत्र आहे. याला कारण म्हणजे जागतिक बँक प्रकल्प विभागातल्या अधिकाऱ्यांची उदासीनता, ठेकेदाराचं मतलबी धोरण, या विभागाच्या उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंत्याची पार्टनरशिप अशा प्रकारात सामान्य जनतेच्या पैशांचा मात्र मोठ्या प्रमाणात चुराडा होतो आहे. या महामार्गावरचे खड्डे बुजविण्याच्या कामात नेवाशाच्या सोनवणे या ठेकेदारानं जागतिक प्रकल्प विभागाला अक्षरशः मुर्खात काढलंय. या ठेकेदाराने तब्बल सव्वा दोन कोटी रुपयांचं काम कमी दराने घेऊनदेखील चक्क १ कोटी ४२ लाख रुपये कमावले आहेत.

अहिल्यानगर ते छत्रपती संभाजीनगर या महामार्गावर वडाळा बहिरोबापर्यंतचे खड्डे बुजविण्याच्या. या कामावर तब्बल सव्वा दोन कोटी रुपये खर्च होऊनदेखील छत्रपती संभाजीनगर महामार्गच्या घोडेगाव परिसरासह सर्वच ठिकाणचे खड्डे 'जैस हे थे'च आहेत. विशेष म्हणजे या कामावर ज्यांनी देखरेख ठेवायची ते उपअभियंता आणि कनिष्ठ अभियंता एकमेकांचे नातेवाईक असून या कामात त्यांची भागीदारी (पार्टनरशिप) असल्याची जोरदार चर्चा नेवासे तालुक्यात ऐकायला मिळत आहे. मागील वर्षी ८० लाखाचे टेंडर झाले ते खड्डे काढायचे त्याची मुदत एक वर्ष होती परंतु ती मुदतीच्या आत खड्डे बुजवण्याचे काम केलेले नाही. सदर ठेकेदार कमी दराने काम करण्यास तयार असून अध्यापही वर्क ऑर्डर दिली नाही, चार महिन्यापासून रस्त्यावर खड्डे पडलेले आहे लोकांना वेठीस धरलेले आहे, कमी दरात ठेकेदार काम करत असून वर्क ऑर्डर दिली जात नाही अशा अनेक समस्या बाबत संशय व्यक्त केला जात असून याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. सव्वादोन कोटी रुपयांचं अंदाजपत्रक असलेल्या या महामार्गाचे काम कमी दराने म्हणजे १ कोटी ९३ लाख ८८ हजार ४९३ रुपये यावर १८ टक्के जीएसटी असे धरुन २ कोटी २८ लाख ७८ हजार ४२१ रुपये खर्चाचं हे काम सोनवणे या ठेकेदारानं कमी दराने घेत तब्बल १ कोटी ४२ लाख १२ हजार रुपये कमवले . या महामार्गावरचे खड्डे मात्र थातूर मातूर म्हणजे अतिशय निकृष्ट पद्धतीने बुजविण्यात आले आहेत. कारण थोड्याशा पावसाने ते खड्डे वाहन चालकांना पुन्हा एकदा खरं आणि घाणेरडं रुप दाखवू लागले आहेत.

### ...तर ठेकेदार आणि अधिकाऱ्यांच्या तोंडाला काळं फासणार

अहिल्यानगर ते वडाळा बहिरोबापर्यंतच्या खड्ड्यांनी वाहन चालकांच्या नाकात दम आणला आहे. नेमका कोणता खड्डा चुकवायचा, असा प्रश्न वाहन चालकांना पडत आहे. या खड्ड्यांमुळे वाहनांचा नुकसान तर होतच आहे. परंतु त्याचबरोबर इंधन खर्च देखील अवास्तव वाढत आहे. जनतेच्या कर रुपी पैशांवर ठेकेदार सरकारी अधिकारी डल्ला मारत असल्यामुळे सामान्य जनतेच्या तळपायाची आग मस्तकापर्यंत जात आहे. नेवासे तालुक्यातल्या काही जागरूक आणि संतप्त सामाजिक कार्यकर्त्यांना हा प्रकार प्रचंड संतापजनक वाटत आहे. या सामाजिक कार्यकर्त्यांनी संबंधित ठेकेदार आणि जागतिक बँक प्रकल्प विभागाच्या अधिकाऱ्यांना कुठलीही पूर्वसूचना न देता कुठल्याही क्षणी काळं फासण्याचा निर्धार केल्याचं खासगीत बोलून दाखवलं आहे.

## 'बोगस दिव्यांग लाभार्थ्यांची चौकशी करा'

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शासनाच्या वतीने दिव्यांगांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत दरमहा आर्थिक स्वरूपात मानधन दिले जाते. तर ग्रामपंचायत, नगरपरिषद पंचायत समिती जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फतही राखीव निधीतून लाभ दिला जातो. परंतु बोगस दिव्यांग याही सवलतींचा व योजनांचा लाभ घेत असून खऱ्या दिव्यांगावर मोठा अन्याय करीत असल्याचे उघडीस आलेले आहे. त्यामुळे अशा दिव्यांग प्रमाणपत्रांची जिल्हा वैद्यकीय रुग्णालयामार्फत सखोल चौकशी करावी अशी मागणी आधार दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण गोरखनाथ खडके पाटील यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की,प्राप्त दिव्यांग प्रमाणपत्रे ही वैद्यकीय दरबारी खरोखर नोंदणीकृत आहेत का? वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करूनच चाचण्या करून सदर प्रमाणपत्र प्रदान केलेले आहे का? तसेच संशयित दिव्यांग प्रमाणपत्र धारक याची फेर वैद्यकीय तपासणी होऊन खरोखर दिव्यांग असल्याची खातरजमा व्हावी. यासाठी अपंग सामाजिक कल्याण व पुनर्वसन संस्था श्रीरामपूर तसेच आधार दिव्यांग संघटना महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष लक्ष्मण गोरखनाथ खडके पाटील यांचे मार्गदर्शनाखाली व राज्य संपर्कप्रमुख राम डमाळे यांचे वतीने तहसीलदार श्रीरामपूर तसेच प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी श्रीरामपूर भाग आणि मुख्याधिकारी श्रीरामपूर नगरपरिषद श्रीरामपूर यांना पत्र देऊन सर्व प्राप्त दिव्यांग प्रमाणपत्रांची चौकशी होऊन गुन्हे दाखल करावे.

## नेवासा पोलीस स्टेशनच्या गणपतीचे विसर्जन



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : पोलीस स्टेशनमध्ये परंपरेनुसार दत्त मंदिरात बसविण्यात आलेल्या गणपतीचे मंगळवारी सायंकाळी सातव्या दिवशीच विसर्जन करण्यात आले. यावेळी मिनी डीजेच्या निनादात काढलेल्या मिरवणुकीत पोलिसांनी धरला ठेका धरत गणपती बाप्पा मोरया चा जयघोष केला.

मंगळवारी सायंकाळी निघालेल्या विसर्जन मिरवणुकीच्या प्रसंगी पोलीस निरीक्षक महेश पाटील यांच्या हस्ते गणपतीच्या मूर्तीचे पूजन करून आरती करण्यात आली.यावेळी उपस्थित सहायक पोलीस निरीक्षक विकास पाटील,पोलीस उपनिरीक्षक शैलेश ससाणे उपस्थित होते.यावेळी पोलीस वाहनाच्या टपावर गणरायाची मूर्ती ठेवण्यात आली होती.शनिवारी विसर्जन मिरवणूक ही तालुक्यात होणार असल्याने बंदोबस्त नियोजनाच्या पार्श्वभूमीवर सातव्या दिवशीय विसर्जन मिरवणूक काढण्यात आली.

## ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेचा अनाथ मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप व पुरस्कार वितरण कार्यक्रम

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : येथील ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दरवर्षी सामाजिक उपक्रम व विविध क्षेत्रातील पुरस्काराचे वितरणाचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी ठीक १२:३० वाजता रुक्मिणी माधव मंगल कार्यालय ,टाकळीभान या ठिकाणी गरजवंत अनाथ निराधार मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती ,संस्था यांना पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे .

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नाशिक पदवीधर मतदार संघाचे आ. सत्यजित तांबे, लखनऊ विद्यापीठाचे माजी. कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, जिल्हा परिषदेचे माजी. उपाध्यक्ष राजेंद्र फाळके, पंचायत समितीच्या माजी सभापती डॉ. वंदनाताई मुरकुटे यांच्या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत तसेच रयत शिक्षण संस्थेचे माजी. सहसचिव प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होत असून याप्रसंगी भारत सरकार नॅक समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. चंद्रकांत मंडलिक, सिनेट सदस्य प्राचार्य सखाराम पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये, राष्ट्र सह्याद्रीचे संपादक करण नवले, माजी. प्राचार्य एकनाथ खांदवे, माजी. सभापती नानासाहेब पवार, शिवसेना शिंदे गट जिल्हा संघटक दादासाहेब कोकणे, 'अशोक'चे संचालक शिवाजीराव शिंदे,सेवा संस्थेचे चेअरमन मंजाबापू थोरात, गटशिक्षणाधिकारी साईलता सामलेटी, न.पालिका प्रशासन अधिकारी संजीवन दिवे, ज्येष्ठ ग्रामीण कवी पोपटराव पटारे,निसर्ग व सामाजिक पर्यावरण मंडळाचे राज्य सचिव डॉ. अनिल लोखंडे , पं. समिती बाल विकास प्रकल्प अधिकारी शोभाताई शिंदे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, माजी. पर्यवेक्षक प्रा.कार्लस साठे ,माजी. प्राचार्य जयकर मगर, ज्येष्ठ ग्रामस्थ श्रीधर गाडे, युवा कार्यकर्ते महेंद्र संत ,आरोग्य मित्र सुभाष गायकवाड, , माजी. सोसायटी संचालक भैय्या पठाण, आदींच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे. तरी कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अर्जुन राऊत व उपाध्यक्ष संदीप पटारे यांनी केले आहे.

## मुर्शतपुर ओम साई गणेश मंडळाचं काम उत्कृष्ट: रेणुकाताई कोल्हे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : धार्मिक कार्यात युवकांचा सहभाग महत्वाचा आहे. मुर्शतपुर येथील ओम साई गणेश मंडळाचे काम उत्कृष्ट असून या मंडळाच्या वतीने अनेक उपक्रम राबविले जातात. युवा नेते विवेक कोल्हे दरवर्षी या मंडळाच्या गणेशोत्सवात आरतीला येत असतात. संजीव उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे, माजी आमदार स्नेहलताताई कोल्हे व कोल्हे परिवाराने कायमच मूर्शतपुर गावावर व ओम साई गणेश मंडळाला प्रेम दिले आहे, असे प्रतिपादन संजीवनी स्वय सहायता महिला बचत गटाचे अध्यक्षा रेणुकाताई कोल्हे यांनी केले.

त्या कोपरगाव तालुक्यातील मुर्शतपूर येथे श्री गणेशाची आरती करताना बोलत होत्या.त्यांचे स्वागत मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व सदस्यांनी केले.यावेळी मंडळाचे मार्गदर्शक रामदास शिंदे यांनी सांगितले की गेल्या पाच ते सहा वर्षांपासून ओम साई गणेश मंडळ गणपतीची स्थापना करत आहे. दरवर्षी महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. कोल्हे परिवाराचे विशेष सहकार्य लाभले असल्याचे त्यांनी सांगितले. श्री गणेशाची आरती झाल्यानंतर सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी मुर्शतपुर व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आ. खताळ हल्ला प्रकरणी माजी मंत्र्यांचे स्वीय सहायक सह आरोपी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : आ. अमोल खताळ यांच्यावर हल्ला करणाऱ्या प्रसाद गुंजाळ यास माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांचे खाजगी स्वीय सहायक भास्कर लहानु खेमनर यांनी चिथावणी दिली असल्याचे पोलीस तपासात निषपन्न झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी या हल्ला प्रकरणी भास्कर खेमनर यांना सह आरोपी केले आहे. त्यामुळे या प्रकरणाला आता वेगळे राजकीय वळण लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी प्रसाद आप्पासाहेब गुंजाळ याची सोमवारी पोलीस कोठडी संपली. त्यास न्यायालयाने पुन्हा न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

आमदार अमोल खताळ यांच्यावर मालपाणी लॉन्स येथे २८ ऑगस्ट रोजी प्रसाद आप्पासाहेब गुंजाळ याने हल्ला केला होता. या हल्ला प्रकरणी प्रसाद गुंजाळ याच्यावर संदेश देशमुख यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल करून त्यास अटक केली होती. त्यास न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने ४ दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. त्याच्या पोलीस कोठडीची मुदत सोमवारी संपली होती. त्यानंतर पोलिसांनी त्यास पुन्हा न्यायालयात उभे केला असता न्यायालयाने त्यास न्यायालयीन कोठडी दिली आहे. या हल्ला प्रकरणातील न्यायालयीन कोठडीमध्ये असलेल्या प्रसाद गुंजाळ याच्या चौकशी तून तसेच त्याच्या मोबाईलच्या तांत्रिक विश्लेषणातून त्याने २२ ते २५ ऑगस्ट दरम्यान माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे खासगी स्वीय सहाय्यक भास्कर खेमनर यांच्याशी मोबाईलद्वारा संभाषण व व्हॉट्सअॅप या सोशल प्लॅटफॉर्मवर संदेशाची देवाण-घेवाण झाल्याचे समोर आलेआहे. त्यामुळे पोलिसांनी भास्कर खेमनर याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ४९ अन्वये अपप्रेरणा दिल्याचा ठपका ठेवून त्यांनाही दाखल गुन्ह्यामध्ये सहआरोपी केले आहे .त्यामुळे त्यांच्या अडचणीमध्ये आता मोठी वाढ होण्याची शक्यता आहे.

## जिल्ह्यातील बारा हजार शेतकऱ्यांना १४ कोटींचा पिक विमा मंजूर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : महायुती सरकारने खरीप हंगाम २०२३ - २४ करीता लागू केलेल्या १ रुपयात पीक विमा योजनेत सहभागी झालेल्या जिल्ह्यातील १२ हजार शेतक-यांना १४ कोटी १९ लाख रुपयांची प्रलंबित रक्कम मंजुर झाली आहे. अशी माहीती जलसंपदा तथा पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली.

महायुती सरकारने शेतक-यांच्या पीकांना विम्याचे संरक्षण मिळावे म्हणून, १ रुपयात पीक विमा योजना सुरु केली होती. या योजनेत जिल्ह्यातील ५ लाख शेतक-यांनी आपला सहभाग नोंदविला होता. योजनेत सहभाग घेतलेल्या शेतक-यांना ११२९ कोटी रुपयांचा विमा मंजुर होवून त्याची रक्कमही शेतक-यांच्या खात्यात जमा झाली होती. मात्र काही शेतक-यांना विम्याची रक्कम मिळणे बाकी होते.

उर्वरित शेतक-यांना विमा रक्कम तातडीने मिळावी यासाठी प्रशासकीय स्तरावर केलेल्या पाठपुराव्या नंतर ही रक्कम मंजुर झाली असून, जिल्ह्यातील १२ हजार ५८६ शेतक-यांना १४ कोटी १९ लाख रुपयांची रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अकोले तालुक्यातील ३७६ शेतक-यांना २५ लाख १५ हजार, जामखेड १ हजार ४३ शेतक-यांना २१ लाख ६ हजार, राहाता ४ हजार १६० शेतक-यांना ५ कोटी ८१ लाख, राहुरी ३९० शेत-यांना ५६ लाख ४८ हजार, संगमनेर ४ हजार ३६३ शेतक-यांना ५ कोटी ६ लाख, श्रीरामपूर २ हजार २५४ शेतक-यांना २ कोटी २७ लाख अशा पध्दतीने हे विमा अनुदान मंजुर झाले आहे. शेतक-यांच्या खात्यात लवकरच हे अनुदान वर्ग होणार असल्याचे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

## एकादशी निमित्ताने आयोजित किर्तन सोहळ्याला भाविकांची गर्दी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील गोणेगाव चौफुला येथील रामकृष्ण आश्रमामध्ये एकनाथी भागवत पारायण सोहळयाच्या निमित्ताने भाद्रपद शुद्ध परिवर्तिनी एकादशी व वैकुंठवाशी हभप गंगाधर महाराज जंगले यांच्या १८ व्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र वेळु येथील हभप संजय महाराज वेळूकर यांच्या आयोजित किर्तन सोहळयाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.वारकरी संप्रदायाला ज्ञानोबा रायांसारखी आई आणि तुकोबारायांसारखा बाप मिळाला हे वारकरी संप्रदायाचे भाग्यच असल्याचे प्रतिपादन सातारा वेळू येथील प्रसिध्द कीर्तनकार हभप संजय महाराज वेळूकर यांनी यावेळी झालेल्या किर्तन सोहळयात बोलतांना केले.



यावेळी बोलतांना संजय महाराज वेळूकर म्हणाले की भारत भूमीला व वारकरी संप्रदायाला मिळालेले महान संत ज्ञानोबा तुकोबा हे असून ज्ञानोबा माऊली तुकाराम च्या जयघोषात लाखो वारकरी पंढरीला जातात ही वारकरी संप्रदायाची ताकद आहे,वारकरी संप्रदायाला ज्ञानोबारायांसारखी आई आणि तुकोबारायांसारखा बाप मिळाला हे वारकऱ्यांचे व संप्रदायाचे भाग्यच असल्याचे त्यांनी सांगितलेकिर्तन सोहळयाच्या प्रसंगी आश्रमाचे प्रमुख भगवान महाराज जंगले शास्त्री, निलेश महाराज रोडे, गहिनीनाथ महाराज आढाव, सोमेश्वर भारती महाराज, रामगड संस्थानचे महंत श्री बाळकृष्ण महाराज दिघे, हनुमान गडाचे महंत संतोष महाराज चौधरी, चांगदेव महाराज काळे,राम महाराज खरवंडीकर, गणेश महाराज आरगडे, राजेंद्र महाराज आसने, हरि महाराज वाकचौरे, सागर महाराज टेमक, लक्ष्मण महाराज शिरसाठ, बदाम महाराज पठाडे,बाजीराव नाना महाराज जाधव, बाळासाहेब महाराज तुवर, देवराम महाराज लांडेवाडीकर, गणेश महाराज गवळी,शेषराव तात्या महाराज,कृष्णा महाराज काकडे,अशोक महाराज बर्डे,सोमनाथ वाफारे, विष्णूपंत ठोसर यांच्यासह विश्वस्त मंडळाचे सदस्य, रामकृष्ण भक्त मंडळाचे सेवेकरी यांच्यासह पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# ४०० ढोल ताशा महावादनातून जपली संगमनेरची एकात्मतेची संस्कृती





**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : आ. सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून संपूर्ण भारतभर ढोल ताशा पथकांच्या माध्यमातून नावलौकिक मिळविणाऱ्या ४०० वादकांना एकत्र करून संगमनेरचा एकरूपतेची संस्कृती दाखवणाऱ्या महावादन महामेळा हा आय लव संगमनेर चळवळीचा उपक्रम राज्यासाठी दिशादर्शक ठरला आहे.

गणेश उत्सवानिमित्त संगमनेर शहरात संगमनेर मधील नामांकित ढोल ताशा पथकाने श्री गणेशाला वादनाच्या माध्यमातून अभिवादन केले. यामध्ये ४०० युवक व युवतींनी सहभाग नोंदवला.

इलेक्ट्रॉनिक वाद्य आणि डीजेच्या जमाने मध्ये पारंपारिक वाद्यांचे महत्त्व वाढले आहे. भारताची वाद्य संस्कृती जिवंत राहावी याकरता संगमनेर मधील विविध कलाकारांनी एकत्र येऊन ढोल ताशा पथक निर्माण केले. परंतु पुढे जसजशी मागणी वाढत गेली तसतसे काही स्वतंत्र ढोल ताशा पथक निर्माण झाले. या सर्व ढोल ताशा पथकांमध्ये तरुणांबरोबर तरुणींचाही सहभाग वाढू लागला. मुंबई पुणे सारख्या शहरांमधून निर्माण झालेले ढोल ताशा पथक आणि अजय अतुल च्या संगीतामुळे ढोल ताशा पथकांची संपूर्ण राज्यभर आणि देशभर क्रेज निर्माण झाली.

यामध्ये संगमनेरच्या ढोल ताशा पथकांचाही मोठा सहभाग राहिला. संगमनेर मधील तांडव, हिंदूराजा, रुद्र, एकलव्य, छावा या ढोल ताशा पथकांचा देशभर लौकिक निर्माण झाला.अगदी काश्मीर ते कन्याकुमारी आणि गुजरात ते पश्चिम बंगाल इथपर्यंत संगमनेर मधील विविध ढोल ताशा पथकांनी आपले कार्यक्रम सादर केले.

कवी अनंत फंदी, शाहीर विठ्ठल उमप, पवळा हिवरगावकर यांच्यापासून सुरू झालेली सांस्कृतिक क्षेत्राची परंपरा पुढे अनेक कलावंतांनी जपली. राज्याचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर हे खऱ्या अर्थाने जिल्ह्याची सांस्कृतिक राजधानी ठरली. नाट्य कलावंत सिने कलावंत विविध मालिकांमधून अनेक गुणवंत कलाकारांनी आपला राज्यभर लवकिक निर्माण केला. याचबरोबर हिंदी मराठी चित्रपट सृष्टीसह शास्त्रीय वादन गायन अशा विविध कला क्षेत्रातील नामवंत मान्यवरांना संगमनेर मध्ये आणून लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी त्यांचे कार्यक्रम संगमनेर वासियांसाठी आयोजित केले.ही मोठी सांस्कृतिक परंपरा असताना तरुणाई मध्ये क्रेझ निर्माण झालेल्या ढोल ताशा पथकांना एका व्यासपीठावर आणण्यासाठी आमदार सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून आय लव संगमनेर या चळवळीच्या माध्यमातून तांडव, हिंदूराजा, रुद्र ,एकलव्य व छावा ४०० कलाकारांच्या उपस्थितीत महावादन सोहळा झाला.

## जाहीर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/२१३/२०२४
नेवासा दिनांक. १०/१०/२०२४

अर्जदार श्री/श्रीम- शिला भाऊसाहेब माळी खलालपिंप्री ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शिला भाऊसाहेब माळी यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-शिला भाऊसाहेब माळी, गावाचे नाव-खलालपिंप्री, जन्म दिनांक-३०/१२/१९८३. करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म- मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

(शिक्का)

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

द • ख • ल

## मराठा आरक्षण ;करंजीत जल्लोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** मराठ्यांना ओबीसीतुन आरक्षण मिळावे यासाठी मुंबई येथे आमरण उपोषणाला बसलेले नेते म्नोज जरांगे पाटील यांचे मुंबई येथील उपोषण यशस्वी झाले असून आता शासनाच्या जीआर नुसार मराठ्यांना आरक्षण मिळणार आहे. या आरक्षणाचा करंजी येथे



तरुणांनी आनंद व्यक्त करत एकमेकांच्या अंगावर गुलाल उधळत विजय दिवस साजरा केला. करंजी, दगडवाडी, भोसे 'वैजूबाभुळगाव या ठिकाणी मराठा आंदोलकांनी मोठा जयघोष करत गुलाल उधळला. हैदराबाद गॅझेट तसेच सातारा गॅजेट लागू होत असल्यामुळे बहुतांश मराठ्यांना आरक्षण मिळून मिळणार असल्याचे जालिंधर वामन यांनी सांगितले. मनोज जरांगे पाटील यांनी मुंबई येथे केलेल्या उपोषणास यश मिळाले असून फटाके फोडत गुलाल उधळत गावोगावी तरुणांनी आनंद साजरा केला. यावेळी उपसरपंच गणेश अकोलकर ,जालिंदर वामन, गजानन गायकवाड , ॲड.संदीप अकोलकर , शिवाजी मोरे, शिवानंद मुखेकर , नवनाथ आरोळे ,बंडू पाठक,दौलत शिंदे यांसह तरुण कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्यवसायाकरिता अर्थसहाय्याच्या योजनेसाठी २० सप्टेंबरपर्यंत अर्ज करा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळामार्फत सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात थेट कर्ज योजनेअंतर्गत ७५ कर्ज प्रकरणांचे उद्दिष्ट जिल्हा कार्यालयास देण्यात आले आहे. या योजनेद्वारे मातंग समाज व त्यातील पोटजातीतील व्यक्तींना व्यवसायाकरिता अर्थसहाय्य दिले जाणार असून, इच्छुकांनी २० सप्टेंबर २०२५ पर्यंत अर्ज दाखल करण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक संजय नाना आरणे यांनी केले आहे.थेट कर्ज योजनेत प्रकल्प मर्यादा १ लाख रुपयांपर्यंत असून त्यामध्ये प्रकल्प खर्चाच्या ८५ टक्के कर्ज, १० हजार रुपये अनुदान आणि ५ हजार रुपये लाभार्थी सहभाग असा तरतुदीचा समावेश आहे.इच्छुक उमेदवारांनी व्यवसायासंबंधी आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतीत अर्ज जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे सादर करावेत.कमअधिक माहितीसाठी जिल्हा कार्यालयाच्या ०२४१-२९९५५१७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## शेवगाव येथे महिलांनी दिला गौरीला निरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव :**परंपरा, भक्ती आणि आनंदाचा सुंदर संगम घडवत शेवगाव शहरासह परिसरात महालक्ष्मी सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. घराघरांत महालक्ष्मीचे आगमन झाले असून महिलांनी मंगलगाणी, आरत्या आणि पारंपरिक विधींच्या माध्यमातून देवीची पूजनअर्चा केली.सकाळपासूनच सणाच्या तयारीने घराघरांत लगबग दिसून आली. फुलांच्या तोरणांनी, आकर्षक रांगोळ्यांनी व विविध सजावटीच्या वस्तूंनी घरांचे सौंदर्य खुलले होते. देवीला नऊवारी साड्या, दागदागिने व फुलांच्या हारांनी अलंकृत करण्यात आले. महिलांनी हळदीकुंकवासाठी एकमेकांना आमंत्रित करून परस्परांमध्ये सौहार्द व आपुलकीचे वातावरण निर्माण



केले असल्याचे सविता,व रुपाली रोडी यांनी सांगितले.संध्याकाळी महिलांनी एकत्र येऊन भजने, गाणी व आरत्या म्हणत महालक्ष्मीची महापूजा केली. विशेष जेवणाचा आस्वाद घेत सणाचे वातावरण अधिक रंगतदार झाले. वाड्या-वाड्यांत, गावागावांत आनंदाचा उत्साह अनुभवायला मिळाला.म''महालक्ष्मीच्या आगमनाने घराघरांत सुख, शांती आणि समृद्धी नांदावी,'' अशा शुभेच्छांमध्ये महालक्ष्मी सण संपन्न झाला.

## गणेश पांढरकर व पायल राहील सेट परीक्षा उत्तीर्ण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या सेट परीक्षेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातील गणेश पांढरकर व पायल





राहील यांनी रसायनशास्त्र विषयाची सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. ही परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे ते आता सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी पात्र ठरले आहेत. सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे. त्यांना रसायनशास्त्र विभाग प्रमुख उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात, डॉ. किरण ढवळे, प्रा. भाऊसाहेब बुलाखे, प्रा. स्वाती नलगे, रसायनशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य प्रो.डॉ. महादेव जरे, उपप्राचार्य प्रो. डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ यांनी त्यांचे अभिनंदन केले.

## बाळासाहेब भारदे हायस्कूलमध्ये मृणालिनी- गंगा स्मृति व्याख्येनाचे आयोजन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर :** शैक्षणिक , साहित्यिक व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रेसर असलेल्या येथील भारदे साक्षरता प्रसारक मंडळाच्या वतीने दि .८ सप्टेंबर ते १३ सप्टेंबर या काळात 'गंगा- मृणालिनी स्मृती' व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष प्रा. रमेश भारदे व निमंत्रक हरीश भारदे यांनी दिली. रोज सकाळी साडेदहा ते बारा यावेळेत पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कुल मधील रावसाहेब पटवर्धन सभागृहात सदर व्याख्याने होणार आहेत. सोमवार दि ८ सप्टेंबर रोजी यजुवेंद्र महाजन( स्पर्धा परिक्षेवर बोलू काही) मंगळवार दि ९ सप्टेंबर रोजी प्रवीण दवणे( दीपस्तंभ, मनातले...जनातले) १०सप्टेंबर रोजी गणेश शिंदे( मोगरा फुलला) ११ सप्टेंबर रोजी डॉ.अंजली धानोरकर( झपाटले पण ते जाणतेपण) १२सप्टेंबर रोजी मुक्ता चैतन्य( मोबाईलचे व्यसन आणि आव्हाने) तर १३ सप्टेंबर रोजी प्रख्यात माध्यमतज्ज्ञ व एबीपी माझाचे संपादक राजीव खांडेकर यांचे समाज माध्यमे व आजची पत्रकारिता असे या व्याख्यानमालेचे नियोजन असून शेवगाव करांना उत्तमोत्तम व्याख्यात्यांचे उत्तमोतम् विषयावरील विचार ऐकता यावेत व यातून विधायक विचार मंथन घडावे हा या आयोजना मागील हेतू असल्याने सर्वांनी या व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त रागिनीताई भारदे यांनी केले आहे.

# केदारेश्वर सहकारी कारखान्याच्या आर्थिक गैरव्यवहारामुळे उस उत्पादक त्रस्त, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** – केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या वाजलेल्या आर्थिक बोजावरामुळे उस उत्पादक शेतकऱ्यांना आजवरही हक्काचे पैसे मिळालेले नाहीत. कारखान्याने साखरेची विक्री करूनही पैसे गायब झाल्याचा आरोप होत असून, शेतकरी वर्गामध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यापूर्वी तहसीलदार कार्यालय व पोलीस प्रशासनाच्या उपस्थितीत अनेक बैठका झाल्या, मात्र शेतकऱ्यांना देयक देण्याचे वेळोवेळी टाळाटाळ करण्यात आले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पुढाकाराने कारखानदारांना दबाव टाकण्यात आला असून, आता शेवटची १२सप्टेंबर ही तारीख पैसे



वर्ग करण्यासाठी देण्यात आली आहे. असे केदारेश्वर सहकारी साखर कारखान्याचे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी तहसीलदार शेवगाव यांना कळवले आहे यावेळी प्रशासन पाठपुरावा करत असल्याची आपली प्रशासनाने संघटनेच्या प्रतिनिधी आहे ही मात्र शेवटची संधी असल्याची प्रशासनाने कारखाना प्रतिनिधींना सांगितले आहे तथापि, वारंवार दिल्या जाणाऱ्या तारखांमुळे शेतकरी वर्गामध्ये रोष निर्माण झाला आहे. तारीख पे तारीख देऊन शेतकऱ्यांचा अंत पाहू नये, तर त्वरित पैसे द्यावेत अशी मागणी स्वाभिमानीशेतकरी संघटना व शेतकरी करत आहेत. संघटनेच्या नेत्यांनीही प्रशासन व कारखानदारांविरोधात आता मोठी भूमिका असल्याचे स्पष्ट केले आहे. शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये, यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पुढील काही दिवसांत कठोर भूमिका घेणार आहे अशी माहिती शेतकरी संघटनेचे दत्तात्रय फुंदे, रावसाहेब लवांडे, बाळासाहेब फटांगडे, मच्छिंद्र आरले ,अशोक भोसले, अमोल देवढे, प्रशांत भराट ,नारायण पायघन, दादासाहेब पाचरणे ,हरिभाऊ कबड्डी ,विकास साबळे, अंबादास भागवत ,मच्छिंद्र डाके उस उत्पादक शेतकरी वर्गातून होत आहे. संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे की, वेळ पडल्यास हा प्रश्न न्यायालयात खेचून कायदेशीर लढा देण्यात येईल

## फटाके विक्रीसाठी परवाने मिळण्यासाठी २५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करा : जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** दिवाळी सण जवळ येत असताना फटाके विक्रीसाठी तात्पुरते परवाने मिळविण्याची प्रक्रिया जिल्ह्यात सुरू झाली आहे. विस्फोटक नियम २००८ मधील तरतुदीनुसार इच्छुकांनी अर्ज करून परवाने घ्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे. अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत २५ सप्टेंबर २०२५ निश्चित करण्यात आली आहे. परवान्यासाठी अर्ज फॉर्म ई-५ मध्ये करणे आवश्यक असून नमुना फॉर्म संबंधित तहसील कार्यालयात उपलब्ध आहे. परवाना प्रक्रियेसाठी अर्ज छाननी फी ३०० रुपये व परवाना फी ५०० रुपये, अशी एकूण ८०० रुपयांची रक्कम भरावी लागेल. ही फी 'अवाळपळींॲरींळींश डशऑींळलशी ठशलशळीं 'पिवशॲ एंग्रीळींश अलीं 'पिवशॲ उेश्रश्रशलींळेप, ००७० जअड' या शीर्षकाखाली स्टेट बँकेत चलनाद्वारे जमा करावी. त्याची मूळ प्रत अर्जासोबत जोडणे बंधनकारक आहे. स्टॉल बसविण्याच्या ठिकाणावरून संबंधित स्थानिक संस्थेची शिफारस आवश्यक आहे. ग्रामपंचायत हद्दीत ग्रामपंचायत, नगरपरिषद हद्दीत नगरपालिका, तर महानगरपालिका किंवा छावणी मंडळ हद्दीत त्यांच्या शिफारशी जोडाव्या लागतील. नियोजित जागा वाणिज्य उपयोगासाठी बिनशेती असावी; अन्यथा सक्षम अधिकाऱ्यांची तात्पुरती बिनशेती परवानगी घेऊन सादर करावी लागेल.सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन आवश्यक फटाके विक्रीसाठी उभारण्यात येणारे तंबू ज्वलनशील पदार्थांचे नसावेत. प्रत्येक स्टॉल बंदिस्त स्वरूपाचा असावा आणि अनधिकृत व्यक्तींना प्रवेश करता येणार नाही याची दक्षता घ्यावी. दोन स्टॉलमध्ये किमान तीन मीटरचे अंतर, तर संरक्षित कार्यस्थळापासून किमान ५० मीटर अंतर राखणे बंधनकारक आहे. स्टॉल समोरासमोर बसविता येणार नाहीत.स्टॉलमध्ये गॅसबत्ती, कंदील किंवा उघडा दिवा वापरण्यास सक्त मनाई आहे. प्रत्येक स्टॉलसाठी स्वतंत्र सुरक्षित विद्युत जोडणी असावी तसेच रांगेनिहाय मास्टर स्विच बसविणे आवश्यक आहे.फटाका स्टॉलपासून ५० मीटरच्या आत फटाके उडविण्यास बंदी आहे. एका समूहात ५० पेक्षा जास्त दुकाने ठेवता येणार नाहीत. शोभेची दारू विक्रीसाठी ूळ आवरणातून बाहेर काढल्यास ती तात्काळ स्वच्छ, धुळीरहित आणि आगप्रतिरोधक पात्रात ठेवावी लागेल. निवासी भागात स्टॉलना परवानगी नाहीजनहित याचिका क्र. १५३/२०१५ मधील आदेशानुसार फटाके विक्री दुकाने निवासी भागात किंवा तळघरात ठेवता येणार नाहीत. दुकाने ुल्या जागेतच असावीत. तसेच साठवणूक परिसर ज्वलनशील किंवा धोकादायक वस्तूंपासून किमान १५ मीटर अंतरावर असावा.अपूर्ण अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अर्ज सादर करताना सर्व आवश्यक कागदपत्रे, शिफारसी व स्वयंघोषणापत्र जोडणे अनिवार्य आहे. अपूर्ण किंवा चुकीने भरलेले अर्ज वीकारले जाणार नाहीत. परवाने मंजूर झाल्यानंतर ते तहसील कार्यालयातूनच वितरित केले जातील, असेही प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## मराठा समाजाचे कार्यकर्ते शरद कुरुमकर व बाळासाहेब जाधव यांचे उपोषण मागे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील मुंढेकरवाडी येथील शरदराव कुरुमकर व बाळासाहेब जाधव हे दोन नागरिक मराठा समाजाचे सर्वेसर्वा मनोज जरांगे



पाटील यांच्या आरक्षण लढ्यातील उपोषणाला पाठिंबा म्हणून मुंडेकरवाडी येथील हनुमान मंदिरासमोर उपोषणास बसले होते . शासनाने मंगळवारी २ सप्टेंबर रोजी मनोज जरांगे पाटील यांच्या आठ मागण्यांपैकी सहा मागण्या मान्य करून तातडीने जीआर काढला. त्यानंतर लिंपणगावच्या मुंढेकरवाडी येथे कुरुमकर व जाधव यांना मागे घेतले.यावेळी उपोषण करते सैनिक संघटनेचे तालुकाध्यक्ष प्रकाश चव्हाण व नवनाथ रंधवे यांच्या हस्ते लिंबू सरबत घेऊन उपोषण सोडले आहे .त्यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून ११४ ग्रामस्थांनी त्यांच्यासोबत बसून पाठिंबा दिला. श्रीगोंदा तालुक्यातील अनेक गावांमध्ये देखील मराठा समाजाचे सर्वेसर्वा म्हणून जरांगे पाटील यांनी मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत घेतलेला पवित्रा व त्यांना जाहीर पाठिंबा म्हणून उपोषण सुरू केले होते. मराठा समाजाच्या महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्यानंतर श्रीगोंदा तालुक्यात सर्वत्र मराठा समाजाकडून जल्लोष करण्यात आला. अनेक मराठा बांधवांनी सुरू केलेले उपोषण देखील मागे घेण्यात आले.

## प्रशासक व ग्रामविकास अधिकाऱ्यांचा समन्वय नसल्याने ग्रामस्थांपुढे मोठ्या अडचणी

### माजी सरपंच अरविंद कुरुमकर यांचा आरोप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येचे गाव समजल्या जाणाऱ्या लिंपणगाव येथील ग्रामपंचायतीच्या सदस्य मंडळाची मुदत संपल्याने सध्या गावचा कारभार पाहण्यासाठी प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे. परंतु ग्रामपंचायत मध्ये प्रशासकाची नियुक्ती झाल्याने विकास कामांना मोठा ब्रेक बसला असल्याचा आरोप माजी सरपंच अरविंद कुरुमकर यांनी केला आहे. पत्रकारांना अधिक माहिती देताना माजी सरपंच कुरुमकर म्हणाले की, गावच्या सदस्य मंडळाची मुदत संपल्याने प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली. परंतु प्रशासक आणि ग्रामविकास अधिकाऱ्यांचा समन्वय नसल्यामुळे सध्या ग्रामपंचायतचा कारभार रामभरोसे असा सुरू आहे. ग्रामस्थांकडून विकास कामासंदर्भात सूचना केल्यानंतर त्या सूचनांची देखील प्रशासक व ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून




कार्यवाही होत नाही. काही दिवसापूर्वी पंचायत समितीकडून गावचा कारभार पाहण्यासाठी प्रशासक नेमले. परंतु प्रशासकांनी ग्रामपंचायतमध्ये आल्यानंतर तीन ते चार विशेष ग्रामसभा घेतल्या. त्यामध्ये ग्रामस्थांनी सुचवलेल्या कुठल्याच कामाला मंजुरी मिळत नाही, अगर त्याची अंमलबजावणी होत नाही. मग विशेष ग्रामसभा घेऊन नेमके साध्य तरी काय होणार आहे? असा आरोप करून माजी सरपंच कुरुमकर पुढे म्हणाले की, गेल्या तीन चार महिन्यापासून ग्रामपंचायतच्या कर्मचाऱ्यांचे पगार थकले असल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येऊन ठेपली आहे. या बाबी आम्ही प्रशासक व ग्रामविकास अधिकाऱ्यांना समजून सांगितल्या. परंतु त्यांच्यामध्ये काहीच सुधारणा होत नाही. अगर कुठल्याही प्रकारची तरतूद केली जात नाही. मागील महिन्यात गावच्या स्मशानभूमीतील जेसीबीच्या साह्याने काटेरी झाडे काढल्यानंतर पुन्हा नवीन वृक्षांची लागवड केली. त्याचा खर्च जवळपास तीन लाखापर्यंत झाला. सध्या वृक्ष लागवड केलेल्या झाडांची देखील देखभाल होत नसल्याने हा खर्च पाण्यात गेल्याचा आरोप श्री कुरुमकर यांनी केला आहे. या बाबींवर ग्रामविकास अधिकारी व प्रशासक निर्णय घेत नाहीत.

* ग्रामविकास अधिकारी श्री धायगुडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, सध्या गावचे विभाजन झाल्याने ते काम आम्हाला करावे लागत असून सध्या ग्रामपंचायतला कर्मचाऱ्यांचे पगार करण्यासाठी पैसे उपलब्ध नाहीत त्यासाठी घरपट्टी, पाणीपट्टी व इतर कर वसूल झाल्यानंतर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे पगार करण्याची तरतूद करू, असे सांगितले.

===============

*. ग्रामपंचायतचे प्रशासक मुकुंद पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, सध्या अनेक ग्रामपंचायतीवर प्रशासक असल्याने माझ्याकडे अन्य इतर ग्रामपंचायतीचा पदभार आहे. ग्रामविकास अधिकाऱ्यांकडून आर्थिक तरतुदी बाबत सविस्तर माहिती घेऊन निर्णय घेऊ, असे सांगितले.

## विद्यार्थ्यांचे नुकसान टाळण्यासाठी शिक्षकांना तातडीने पदोन्नती द्या : चंद्रशेखर पंचमुख

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्ह्यातील शेकडो शाळा अद्यापही मुख्याध्यापकांविना चालत असून, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर मोठा परिणाम होत आहे. गेल्या वर्षभरापासून मुख्याध्यापक पदावर कोणतीही पदोन्नती झाली नसल्याने ही गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) सामाजिक न्याय विभागाचे नगर तालुकाध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांनी प्राथमिक शिक्षणाधिकारी भास्कर पाटील यांना निवेदन देऊन तातडीने मुख्याध्यापक पदोन्नतीची मागणी केली. पंचमुख यांनी स्पष्ट केले की, जिल्ह्यातील अनेक शाळांमध्ये ज्येष्ठ शिक्षकांकडे वर्ग सांभाळण्याबरोबरच मुख्याध्यापकांचा अतिरिक्त कार्यभारही आहे. शिक्षकांवर दुहेरी ताण येत असून, त्यामुळे अध्यापनाची गुणवत्ता घसरते. परिणामी विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. गेल्या वर्षभरात पदोन्नती प्रक्रिया लवकरच होईल, असे शिक्षण विभागाने वारंवार सांगितले. मात्र प्रत्यक्षात



अद्याप नियुक्ती झालेली नाही. तालुकास्तरावरून वेळोवेळी माहिती मागवली जाते, याद्या प्रसिद्ध होतात; पण मुख्याध्यापक पदोन्नती रखडलेलीच आहे. पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये शिक्षकांना मुख्याध्यापक पदोन्नती देण्यात आली आहे, मात्र अहमदनगर जिल्हा परिषद मात्र मागे पडली आहे,

असेही त्यांनी निदर्शनास आणून दिले. यंदाच्या २०२५ च्या बदली प्रक्रियेत फक्त दोनच मुख्याध्यापकांच्या बदल्या झाल्या. मग शेकडो रिक्त जागांवर पदोन्नती का केली जात नाही? शिक्षण विस्तार अधिकाऱ्यांची पदोन्नती सहा महिन्यांत तीन वेळा केली जाते, मात्र शाळांना मुख्याध्यापक देण्यात विलंब का? असा थेट सवाल पंचमुख यांनी शिक्षण विभागाला केला. पंचमुख यांनी इशारा दिला की, शिक्षक दिन (५ सप्टेंबर) पर्यंत मुख्याध्यापक पदाच्या रिक्त जागांवर पदोन्नती प्रक्रिया पूर्ण न झाल्यास विद्यार्थ्यांच्या हितासाठी पुढील आंदोलन छेडले जाईल.

## चोंडी मध्ये गावठी कटटा घेवून दहशत निर्माण ,अजित उबाळे जेरबंद, जामखेड पोलीसांची धडाकेबाज कारवाई

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** तालुक्यातील चोंडी येथील आरोपी अजित उबाळे हे चापडगाव जाणारे रोडवर त्याचे हातात अग्नीशस्त्र हत्यार विनापरवाना जवळ बाळगून फिरत होता अशी बातमी पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली , निरीक्षक चौधरी यांनी सदरची माहीती सपोनि नंदकुमार सोनवलकर, पोकॉ. देविदास पळसे, पोकॉ. कुलदिप घोळवे यांना देली सदरचे पथक खाजगी वाहनाने अजित लालासाहेब उबाळे रा. चोंडी याचा शोध घेणेकामी चोंडी येथे रवाना होवून चोंडी गावात शोध घेत असताना अजित लालासाहेब उबाळे हा चौंडी ते चापडगाव जाणारे रोडवर सिना नदीच्या पुलाजवळ दिसला त्यावेळी त्याचे हातात अग्णीशस्त्र हत्यार दिसुन आले तेव्हा आम्ही त्यांचा पाठलाग केला असता तो सदरचे पथकास पाहुन नदीच्या किनारी असलेल्या काटेरी झाडात पळुन गेला होता. त्यानंतर दि.२सप्टेंबर रोजी अजित उबाळे हा गावठी कटटा हत्यार विनापरवाना बेकायदा स्वतः चे ताब्यात बाळगुन लोकांमध्ये दहशत निर्माण करताना दिसुन आला आहे. म्हणुन त्याचे विरूध्द पोलीस कॉ. कुलदिप घोळवे यांनी जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा



दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर सदर आरोपीचा शोध घेत असताना तो पाटोदा गावचे शिवारात येणार असल्याची गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाल्याने सपोनि नंदकुमार सोनवलकर, पोकॉ. देविदास पळसे, पोकॉ. कुलदिप घोळवे यांनी सदर ठिकाणी सापळा रचून आरोपी अजित उबाळे यास त्याचे जवळील गावठी कटटयासह मिळून आल्याने त्यास ताब्यात घेतले आहे. सदरची ही कारवाई पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उप विभागीय पोलीस अधिकारी प्रविणचंद्र लोखंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी, सपोनि नंदकुमार सोनवलकर, पोकॉ. देविदास पळसे, पोकॉ. कुलदिप घोळवे तसेच दक्षिण विभाग मोबाईल सेलचे पोकों. नितीन शिंदे यांनी केली आहे.

# विवाह समारंभा पूर्वी वृक्षारोपण करत पर्यावरणाचा संदेश

## आखाडे, राऊत कुटुंबाचा उपक्रम

भाऊसाहेब वाडगे । राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव:** साखरपुडा सोहळा होण्याअगोदर वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाची शपथ घेऊन मिरजगाव येथील ज्येष्ठ पत्रकार किशोर आखाडे यांचे चि.ऋषिकेश व विकास राऊत यांची कन्या व इंदापूर येथील ग्रामसेवक संजय यादव यांची भाची चि.सौ.का.विद्या यांचा शुभविवाह मिरजगाव येथील पाटील लॉन्स या ठिकाणी वेगळेत पार पडला. या सोहळ्यासाठी आष्टी पाटोदा मतदार संघाचे माजी आमदार भीमरावजी धोंडे, सावता परिषदेचे अध्यक्ष कल्याण आखाडे, अहिल्यानगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा, अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेचे संचालक बाळासाहेब साळुंके, खा.निलेश लंके यांच्या पत्नी राणीताई लंके संचालक भाजपा नेते नेते अंबादास पिसाळ,भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सचिन पोटरे, जि.प.सदस्य गुलाब तनपुरे, अशोकराव खेडकर,मा. जि.प.सदस्य राजेंद्र गुंड, कुंडलीक जायभाय, नितीन खेतमाळस,सावता परिषदेचे तालुका अध्यक्ष डॉ. पढरीनाथ गोरे, शिवसेना नेते अमृत लिंगडे, सरपंच सुनिता खेतमाळस, मिरजगाव पो.स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, राजेंद्र गोरे ,उध्दव



नेवसे उपसरपंच विर पमाटील,मिरजगाव डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विलास कवळे, डॉ . महेंद्र चेडे, मा.प.स.उपसभापती प्रशांत बुद्धिवंत, बबन दळवी, ह.भ.प.हरिभाऊ जंजीरे, आजी माजी सरपंच , सदस्य ह.भ.प.आदिनाथ झांबरे ,खरबुजे महाराज,मा.प्रचार्य विलास साठे, किशोर खुरांगे, अशोक खेडकर, रामचंद्र निंबोरे यांच्या सह कुमार छात्रालय उरूळी कांचन ग्रुप, मित्र मंडळ, अधिकारी सामाजिक , धार्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. लग्न म्हटले की वरात जेवण फटाके मानपान या सगळ्या गोष्टी आल्याच. पण आजची किती लग्न ही सामाजिक बांधिलकी जोपासतात? किती लग्नांमध्ये पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न केले जातात? पण मिरजगाव मध्ये सामाजिक बांधिलकी जोपासणारा लग्नसोहळा पार पडला. लग्नात सत्कार समारंभास फाटा देत आलेल्या सर्वच स्नेही पाहुण्यांचे शब्दसुमानांनी स्वागत केले. गेली दोन वर्षापासून मिरजगाव मध्ये पर्यावरण संवर्धनाचे काम करणारा श्रमदान फाउंडेशन या ग्रुपला आर्थिक मदत केली. तसेच मिरजगाव येथील पाटील लॉन्स संचालक संपतराव बावडकर पाटील यांना पत्रकार सुधीर आखाडे मुलाचे आजोबा महादेव धोंडे यांनी साखरपुडा सोहळा सुरू होण्याच्या अगोदर वृक्षारोपण करून पर्यावरण रक्षणाची शपथ घेऊन या सोहळ्याची सुरुवात करावी अशी संकल्पना व्यक्त केली. बावडकर पाटील यांनी लगेच या सुंदर संकल्पनेस मान्यता देत कार्यालयाच्या परिसरातच जागा उपलब्ध करून देत वधुवराच्या हस्ते आंब्याच्या झाडाचे कसलाही गाजावाजा न करता रोपण केले. सफाई करणाऱ्या व घरकाम करणाऱ्या दोन महिलांना साडीचोळीचा मान देत त्यांचा सन्मान करत सामाजिक बांधिलकी जपली. पर्यावरण रक्षणासाठी झाडे लावा झाडे जगवा हा संदेश समाजात रुजवण्याचा निश्चय महादेव आखाडे गुरूजी व राऊत आखाडे कुटुंबीयांनी केला. त्यांच्या या उपक्रमाचे श्रमदान फौंडेशन ने कौतुक करून वधू-वरांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. मिरजगाव - आखाडे राऊत शुभविवाह समारंभ सत्काराला फाटा देऊन मिरजगाव श्रमदान फाउंडेशन ला मदत देताना पत्रकार किशोर आखाडे आखाडे गुरुजी

द·ख·ल

# किरकोळ वादातून युवकाला कोयत्याने मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे** शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पुणे नगर महामार्गालगतच्या बजरंगवाडी येथून विशाल तळेकर हा दुचाकीहून चाललेला असताना विशालच्या ओळखीच्या हर्षल शिंदे व सौरभ शिंदे यांच्यासह एका अनोळखी युवकाने विशालला थांबवून तुला गाडी नीट चालवता येत नाही का, तुला खूप माज आला आहे का असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी करुन त्यांच्या जवळील लाकडी मुठ असलेल्या कोयत्याच्या उलट्या बाजूने मारहाण करुन जखमी केले, याबाबत विशाल प्रकाश तळेकर (वय ३६ वर्षे रा. करंदी ता. शिरुर जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी हर्षल शिंदे व सौरभ शिंदे (दोघे रा. फुलगाव ता. हवेली जि. पुणे) यांसह एका अनोळखी युवकावर गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार बापू हाडगळे हे करत आहे.

## ग्रामपंचायतकडुन शाळेला साहित्य भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी :** जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील ग्रामपंचायत कार्यालयाने जारकरवाडी गावातील आदर्श माध्यमिक विद्यालयाला



तीस हजार रुपये किमतीची साहित्य भेट दिले आहे. यामध्ये ४५ स्पोर्ट्स ड्रेस, १५ दोर उड्या, १० बॅडमिंटन सेट, ३ हॉलीबॉल इत्यादी साहित्य भेट देण्यात आले यावेळी सरपंच प्रतिक्षा बढेकर, माजी उपसरपंच कौसल्या भोजने, सुवर्णा भांड, सचिन टाव्हरे, ग्रामपंचायत सदस्य सुरेश मंचरे श्रावण काकडे आदी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे नियोजन भोर , संजय वळसे, आढळराव यांनी केले तर सुत्रसंचलन शेंगाळे.यांनी केले तर आभार प्रदर्शन वाघमारे यांनी मानले राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पारोडीत युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे :** पारोडी (ता. शिरुर) येथील सागर पवार हा युवक घराजवळ असताना काही वेळाने सागरने घराच्या एका गजाला गळफास घेतल्याचे दिसून आल्याने सागर यांची पत्नी पूजा पवार यांनी नागरिकांच्या मदतीने सागरला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी सागर राजू पवार (वय २७ वर्षे रा. पारोडी ता. शिरुर जि. पुणे) याला मृत घोषित केले. पूजा सागर पवार (वय २५ वर्षे सध्या रा. पारोडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. राजीव गांधी नगर ता. निफाड जि. नाशिक) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे खबर दिल्याने पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार किशोर तेलंग हे करत आहे.

## काकडे महाविद्यालयात आविष्कार संशोधन स्पर्धा मार्गदर्शन कार्यशाळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर -** बारामती तालुक्यातील मु.सा काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व मु.सा. काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आविष्कार संशोधन स्पर्धेनिमित्त एक दिवशीय मार्गदर्शनपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी तसेच विद्यार्थ्यांकडून नाविन्यपूर्ण संशोधन प्रकल्प तयार व्हावेत व असे संशोधन प्रकल्प समाज हितासाठी दिशादर्शक ठरावेत या उद्देशाने आविष्कार संशोधन स्पर्धा घेतली जाते. आविष्कार संशोधन स्पर्धेमध्ये प्रकल्प कसे तयार करावेत व प्रकल्पांचे विषय कसे निवडावेत या संदर्भात टी.सी महाविद्यालय बारामतीचे उपप्राचार्य व भूगोल विभाग प्रमुख डॉ.अरुण मगर यांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देविदास वायदंडे यांनी आविष्कार संशोधन स्पर्धेचे विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्त्व अधोरेखित करून मानवी विकासात संशोधनाचे महत्त्व याविषयी उत्तम



मार्गदर्शन केले. सदरच्या कार्यशाळेत महाविद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सदरच्या कार्यशाळेप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. जगन्नाथ साळवे , डॉ. जया कदम, आय.क्यू. ए.सी. समन्वयक डॉ. संजू जाधव, डॉ. बाळासाहेब मरगजे, डॉ. दत्तात्रय डुबल, डॉ.राहुल खरात, प्रा. नामदेव जाधव इत्यादी प्राध्यापक वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ए. आर. सी. समन्वयक डॉ.श्रीकांत घाडगे यांनी केले तर प्रा. रजनीकांत गायकवाड यांनी आभार मानले.

## मराठा समाजाच्या मागण्या मान्य झाल्याने शिंगवे येथे मराठा बांधवांचा जल्लोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिंगवे पारगाव :** मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील यांचे उपोषण सुरू होते. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या सरकारने मान्य केल्या असून मराठा समाजाला आरक्षणाचा मार्ग मोकळा झाल्याने शिंगवे ता. आंबेगाव येथील मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी व शिंगवे करांनी एकत्र येत आनंद व्यक्त केला आहे. यावेळी मराठा बांधवांनी एकमेकांना पेढे भरवत, फटाके फोडत आनंद साजरा केला आहे. मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी गेल्या पाच दिवसापासून मुंबई येथे आझाद मैदानावर उपोषणाला बसले होते त्यांच्या आरक्षणाच्या मागणीला यश मिळाले असून त्यांच्या आरक्षणाच्या मागण्या सरकारने मान्य करत राज्य सरकारने याबाबतचा जीआर जारी केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी पाचव्या दिवशी राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हाताने सरबत घेऊन उपोषण मागे घेतले आहे. राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा आदेश काढल्याने राज्यभरात मराठा बांधवांनी एकच जल्लोष करत फटाके फोडत एकमेकांना पेढे भरवत साजरा केला आहे. शिंगवे तालुका आंबेगाव येथे मराठा समाजाच्या तरूण कार्यकर्त्यांनी शिंगवे गावातुन मिरवणूक मिरवणूक काढण्यात आली तसेच एकत्र येत एकमेकांना लाडू भरून आनंद व्यक्त केला आहे. यावेळी एक मराठा लाख मराठा अशा घोषणा देत मराठा बांधवांनी जल्लोष केला यावेळी मराठा बांधव लाला अर्बन संचालक नारायणशेठ गाढवे, भगतसिंग पतसंस्था चेअरमन बाळासाहेब गोरडे, पोलिस पाटील गणेश पंडित, उपसरपंच हिरामण गोरडे, चेअरमन दत्ता गोरडे, पीडीसी बॅक मॅनेजर दत्ता गाढवे , उद्योजक लक्ष्मण गाढवे,दिलीप गोरडे,यासह मराठा बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुखई आश्रम शाळेचा जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत डंका

**भटके विमुक्त दिनाच्या निमित्ताने पुण्याचे सहाय्यक संचालक प्रदीप संपकाळ यांच्या कल्पनेतून पुणे जिल्ह्यातील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना एक मोठे व्यासपीठ निर्माण करून देण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळाला असल्याचे कै. रामराव गेणूजी पलांडे प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयचे प्राचार्य तुकाराम शिरसाट यांनी सांगितले.**

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे,** मुखई (ता. शिरुर) येथील कै. रामराव गेणूजी पलांडे प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय या शाळेने जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेसह रांगोळी, चित्रकला, निबंध व वक्तृत्व स्पर्धेत घवघवीत यश मिळविले असल्याची माहिती प्राचार्य तुकाराम शिरसाट यांनी दिली आहे. मुखई (ता. शिरुर) येथील कै. रामराव गेणूजी पलांडे प्राथमिक व माध्यमिक आश्रम शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय शाळेने इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत भटके विमुक्त दिवस साजरा करण्याच्या निमित्ताने व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी निमित्ताने आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी रांगोळी, चित्रकला, निबंध, वक्तृत्व तसेच सांस्कृतिक स्पर्धे



मुखई (ता. शिरुर) येथील कै. रामराव गेणूजी पलांडे विद्यालयातील यशस्वी विद्यार्थी. (छायाचित्र आकाश भोरडे)

चे तीन गटात आयोजित केलेल्या स्पर्धे त सहभाग घेऊन सांस्कृतिक स्पर्धेत पुणे जिल्हयात प्राथमिक व माध्यमिक दोन्ही गटात प्रथम क्रमांक पटवला आहे, यामध्ये चित्रकला स्पर्धेत प्राथमिक गटात राज धनवटेने प्रथम तर शिवम माळीने तृतीय क्रमांक मिळवला आहे, माध्यमिक गटात वैष्णवी गायकवाडने द्वितिय आणि उच्च माध्य गटात भूमिका देशमुखने प्रथम क्रमांक मिळवला आहे, तसेच रांगोळी स्पर्धेत प्राथमिक गटात अनुष्का कांबळेने तृतीय तर माध्यमिक गटात सोनाली सूर्यवंशीने तृतीय क्रमांक तसेच मोठ्या गटात क्रांती दगडेने द्वितिय क्रमांक मिळवला, तर वक्तृत्व स्पर्धेत प्राथमिक गटात प्रणवी पवारने तृतीय क्रमांक आणि माध्यमिक गटात सिध्दी माळीने प्रथम क्रमांक तसेच उच्च माध्यमिक गटात सिध्दी उचाळेने प्रथम, किर्ती काळेने द्वितिय क्रमांक मिळवला असताना निबंध स्पर्धेत प्राथमिक गटात अक्षदा आंधळेने प्रथम, ईश्वरी नजनने द्वितिय क्रमांक आणि माध्यमिक गटात संस्कृती झावरेने प्रथम, स्वाती शिरसाटने द्वितिय क्रमांक आणि मोठ्या गटात नयन सुक्रेने तृतीय क्रमांक मिळवला आहे,

# रायरीत निवृत्त सैनिकाचे जल्लोषात स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर:** सैनिक म्हणून देशसेवेसाठी २४ वर्षे सेवा केल्यानंतर रायरी (ता.भोर ) परतलेल्या सैनिकाचे गावकऱ्यांनी गावातुन मिरवणूक काढत जल्लोषात स्वागत केले.यावेळी आबालवृध्दांसह महिला मोठ्या संख्येने सामील झाल्या होत्या.गावाचे प्रेम पाहुण सैनिक भारावुन गेला.९ मराठा ला ई अशोकचक्र बटालीयन आणि २५ मराठा लाईट ईफंट्री मध्ये सैन्य दलातील जवान अंकुश गेनबा किंद्रे हे ३१ ऑगस्टला २४ वर्ष सेवा करुन निवृत्त झाले.त्यानंतर ते त्याच्या मूळ गावी रायरी येते परतले गावातील ग्रामस्थांनी सजवलेल्या ट्रॅक्टरवरून गावाचे ग्रामदैवत भैरवनाथाचे दर्शन





निवृत सैनिकाचे स्वागत करताना रायरी ग्रामस्थ (छाया –विक्रम शिंदे )

घेऊन गावाच्या वेशीपासून ढोल ताशा तालावर नाचत पावसात भिजत जल्लोषात स्वागत करत किंद्रे यांची मिरवणूक काढली.मंडळाचा कार्यकर्ता देश सेवेतून निवृत्त होऊन पुन्हा आपल्यात सहभागी झाल्यावर मंडळाच्या कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलुन आले होते.महिलांनी गावातील चौका चौकात त्याचे औक्षण केले गावकऱ्याचे प्रेम पाहून अंकुश किंद्रे भारावून गेले .ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी नामदेवमहाराज किंद्रे,नावजी किंद्रे,नारायण किंद्रे,सुर्यकांत किंद्रे,तुकाराम किंद्रे,शंकर किंद्रे,गोरक्ष डेरे,मंगेश किंद्रे,लहु किंद्रे,नितिन किंद्रे बा किंद्रे दत्तात्रय डेरे,सुरेश किंद्रे,निकेश किंद्रे,श्री वरे,राजेंद्र किंद्रे,बाळु रेणुसे,वसंत किंद्रे,अमोल किंद्रे,गणेश किंद्रे व ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान भोर शहरातील चौपाटी येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतुळला पुष्पहार जवान अकुंश किंद्रे यांच्या हस्ते घालुन सकल मराठा समाजच्या वतीने स्वागत करण्यात आले. यावेळी बोलताना अंकुश किंद्रे म्हणाले देशाची सेवा करणे हे सर्वश्रेष्ठ असून माझ्या कार्यकाळात मी जम्मू काश्मीर हिमाचल प्रदेश पंजाब हरियाणा आसाम संपूर्ण भारतभर सेवा केली तसेच परदेशातील दोन–तीन देशांमध्ये सुद्धा सेवा करण्याचे योग आला यावेळी अनेक कठीण प्रसंगांना तोंड द्यावे लागले मात्र देश सेवेसाठी यापुढेही लढत राहू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## विद्यानिकेतनच्या शौर्यदीप गुळवेला तायक्कांदो स्पर्धेत सुवर्णपदक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**चितळी -** श्रीरामपूर येथील विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी शौर्यदीप विशाल गुळवे (रा.चितळी) याने दिनांक २३ ऑगस्ट रोजी श्रीरामपूर येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय



कराटे तायक्कांदो स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्याच्या या उत्तुंग यशामुळे त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. शौर्यदीपच्या या यशाबद्दल सरपंच नारायणराव कदम, पालक विशाल गुळवे मौनगिरी कृषी उद्योगचे संचालक शिवाजीराजे कदम यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मराठा आरक्षणाचा विजय;वासुंदेत आनंदोत्सव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर :** मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे या प्रमुख मागणीसाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील गेल्या पाच दिवसांपासून मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणाला बसले होते. राज्य सरकारने मराठा आरक्षणासंदर्भातील सर्व मागण्या मान्य केल्यानंतर जरांगे यांनी आपले उपोषण मागे घेतले. या निर्णयामुळे मराठा समाजात आनंदाचे वातावरण पसरले असून, जरांगे यांनी मराठ्यांचा आरक्षणाच्या लढ्यात विजय झाला असे भावनिक उद्गार काढले.या विजयाच्या आनंदात अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील वासुंदे गावात मराठा ग्रामस्थांनी फटाके फोडून आणि उत्साहपूर्ण



विजय हीच खरी एकजुटीची ताकद : बापूसाहेब गायखेमराठा आरक्षणाचा लढा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होता. या लढ्यात मनोज जरांगे यांनी उपोषण, मोर्चे आणि जनजागृतीच्या माध्यमातून समाजाला एकत्र आणले. सरकारने मागण्या मान्य केल्याने मराठा समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. वासुंदे गावातील ग्रामस्थांनी हा विजय समाजाच्या भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा असल्याचे सांगितले. आमच्या पिढ्यांना याचा फायदा होईल, ही खरी एकजुटीची ताकद आहे, असे बापूसाहेब गायखे म्हणाले.

वातावरणात आनंदोत्सव साजरा केला. गावकऱ्यांनी एकत्र येऊन या ऐतिहासिक यशाचा जल्लोष केला. यावेळी बापूसाहेब गायखे, अभिनव पाटोळे, आदित्य शिर्के, गणेश बर्वे, राजेश सावंत, अजित झावरे, भाऊसाहेब झावरे, नितीन शिंदे, बबलू शिंदे, संदीप खंडाळे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. त्यांनी मराठा समाजाच्या एकजुटीचे आणि जरांगे यांच्या नेतृत्वाचे कौतुक केले.या यशामुळे मराठा समाजात नवचैतन्य निर्माण झाले आहे. वासुंदेसह राज्यभरातील मराठा समाज आता पुढील आव्हानांसाठी सज्ज झाला आहे. जरांगे यांनीही सरकारला दिलेल्या आश्वासनांची पूर्तता लवकर होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## माळीवाडा तरुण मंडळाचा आगळावेगळा उपक्रम

### ‘नारीशक्तीची दहीहंडी’ भव्य देखाव्यातून साकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** गणेशोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नाही तर समाजप्रबोधनाची आणि सामाजिक भान जागविण्याची संधी आहे, हे पुन्हा अधोरेखित करणारा आगळावेगळा उपक्रम माळीवाडा तरुण मंडळाने यंदा राबवला आहे. मंडळाच्या वतीने उभारण्यात आलेल्या दहीहंडी – नारीशक्तीची या भव्य देखाव्याचे उद्घाटन आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. स्त्रीशक्ती ही समाजाच्या प्रगतीची अनिवार्य ताकद आहे. शिक्षण, उद्योग, कला, क्रीडा, राजकारण अशा सर्व क्षेत्रांत महिलांनी लौकिक मिळवला आहे. माळीवाडा तरुण मंडळाने महिलांना केंद्रस्थानी ठेवून घेतलेली ही कल्पना अत्यंत प्रेरणादायी असून इतरांसाठी आदर्श ठरेल, असे प्रतिपादन आमदार जगताप यांनी यावेळी केले.

या वेळी अध्यक्ष निलेश खरपुडे, माजी नगरसेवक अविनाश घुले, प्रा. माणिकराव विधात, उपाध्यक्ष मयुर भापकर, पैलवान गणपतराव चेडे, खजिनदार आशिष खंदारे, विष्णुपंत म्हस्के, विनायक वडे, शुभम भापकर, श्रीकांत आंबेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

माळीवाडा तरुण मंडळाच्या देखाव्यात ३५ मूर्तींच्या माध्यमातून महिलांचे विविध पैलू साकारले आहेत. मातृत्व, पराक्रम, त्याग, कर्तृत्व आणि सामर्थ्याचे दर्शन घडविणाऱ्या या मूर्तींनी प्रेक्षकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले. पारंपरिक दहीहंडीचा देखावा महिलांच्या रूपातून उभा राहिल्याने नागरिक भारावून गेले.

प्रास्ताविक अध्यक्ष निलेश खरपुडे यांनी करताना, गेल्या अनेक वर्षांपासून आमचे मंडळ सामाजिक जाणीव जागवणारे उपक्रम राबवत आहे. स्त्री–पुरुष समानतेचा विचार रुजविण्यासाठी यंदा हा उपक्रम उभारला आहे. महिलांचे योगदान दुर्लक्षित करून समाजाची प्रगती होऊच शकत नाही, असे स्पष्ट केले. प्रास्ताविक मयुर भापकर यांनी केले तर आभार खजिनदार आशिष खंदारे यांनी मानले. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर माळीवाडा तरुण मंडळाचा नारीशक्तीची दहीहंडी हा उपक्रम केवळ धार्मिक रंगत न वाढवता समाजाला संदेशही देणारा ठरला आहे.

# काकडे महाविद्यालयात आविष्कार संशोधन स्पर्धा मार्गदर्शन कार्यशाळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** बारामती तालुक्यातील सोमेश्वरनगर येथील मुख्य चौक करंजेपूल येथे मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनाच्या यशस्वी समारोपानंतर गावागावात गुलाल, फटाके, डिजे आणि पेढ्यांनी मराठा आरक्षणाचा विजयीउत्सव साजरा करण्यात आला. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुबंईतील आझाद मैदानावर गेल्या पाच दिवसापासुन सुरु असलेल्या मराठा आरक्षणाच्या लढ्याला अखेर मंगळवारी (ता.२) रोजी सांयकाळी सर्वात मोठे यश मिळाल्याने बारामती तालुक्यातील गावा-गावात गुलाल उधळुन, फटाके फोडुन, एकमेकांना लांडु, पेढे भरवत, ढोल, ताशे वाजवत मराठा समाज बांधवांनी मराठा आरक्षणाचा विजयीउत्सव मोठ्या जल्लोष साजरा केला._मुबंईतील आझाद मैदानावर गेल्या पाच दिवसापासुसुरु होते.





सोमेश्वर पंचक्रोशीतील मराठा बांधव व करंजेपूल ग्रामस्थ यांच्यावतीने बांधवांसाठी रसद पाठवण्यात आली. मंगळवारी (ता २) मिळालेल्या यशाचे सर्वांना अभिनंदन. वैभव गायकवाड माजी सरपंच करंजेपुल _सोमेश्वरनगर पंचक्रोशीतील सर्व मराठा बांधव मनोज जरांगे पाटील यांच्या कायम सोबत राहणार व आरक्षण मिळून दिल्याबद्दल वाघळवाडी सोमेश्वरनगर नागरिकांच्या वतीने मी आपला ऋणी आहे.तुषार सकुंडे उपसरपंच वाघळवाडी

# आळंदीत ‘बाबा महाकाल भस्म आरती’ चा देखावा ठरतोय विशेष आकर्षण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** गणेशोत्सवात दरवर्षी विविध ऐतिहासिक, धार्मिक व सामाजिक संदेश देणारे देखावे साकारले जातात. यंदा आळंदी शहरात अमित जयसिंग कुऱ्हाडे यांनी त्यांच्या घरी साकारलेल्या ‘बाबा महाकाल भस्म आरती’ या देखाव्याने भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे. उज्जैनच्या महाकालेश्वर ज्योतिर्लिंगातील पहाटेची भस्म आरती नेत्रदीपक असते. त्याच आरतीचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याचा भास आळंदीतील गणेशभक्तांना होत असून हा देखावा शहरात चर्चेचा विषय ठरला आहे.



आळंदी येथील विलास कुऱ्हाडे, गणेश कुऱ्हाडे, अमित कुऱ्हाडे, अक्षय कुऱ्हाडे यांनी विशेष परीश्रम घेऊन मंडपात उभारलेले महाकाल मंदिर, सजवलेले नंददीप, आरतीचे मंत्रोच्चार व पार्श्वभूमीवर वाजणारे भजनी संगीत यामुळे वातावरण अत्यंत भक्तिमय झाले आहे. शिवभक्तांसह गणेशभक्त भाविकांनी या देखाव्यास मोठी गर्दी केली आहे. सकाळ–संध्याकाळ दर्शनासाठी येणारे भाविक ‘हर हर महादेव’च्या घोषात भस्म आरतीचा अनुभव घेतात. ‘बाबा महाकाल भस्म आरती’चा देखावा हा गणेशभक्तांसाठी विशेष आकर्षण ठरला असून, शहराबाहेरील भाविकही दर्शनासाठी मोठ्या संख्येने दाखल होत आहेत. या देखाव्यामुळे आळंदीकरांना उज्जैन येथील महाकालेश्वर मंदिराची प्रत्यक्ष अनुभूती मिळत असल्याची भावना व्यक्त होत असून, गणेशोत्सवातील हा देखावा भाविकांसाठी अद्वितीय अध्यात्मिक अनुभव ठरत आहे.

# शिक्रापुरात युवकांकडून आरक्षणाच्या विजयाचा जल्लोष

## फटाक्याच्या आतिषबाजीत एक मराठा : लाख मराठाचा जयघोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**तळेगाव ढमढेरे,** मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या आझाद मैदानावर सुरु असलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला यश आल्यानंतर शिक्रापूर पाबळ चौकात युवकांनी फटाक्यांच्या आतषबाजीत जल्लोष करत एकमेकांसह मुंबईहून येणाऱ्या समाज बांधवांना पेढे भरवून आरक्षणाच्या विजयाचा जल्लोष केला आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) येथील पाबळ चौकात मराठा आरक्षणाच्या विजयार्थ युवकांनी एकत्र येत आंदोलनाचे प्रणेते संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांचा फोटो हातात घेऊन एक मराठा लाख मराठा, मनोज जरांगे पाटील जिंदाबाद या घोषणा देत फटाक्यांची आतषबाजी करत मुंबईहून येणाऱ्या समाज बांधवांचे स्वागत करुन एकमेकांना पेढे भरवत विजयाचा जल्लोष करत मनोज जरांगे पाटील यांचा फोटो उंचावत आनंदोत्सव साजरा केला, यावेळी दत्ता कवाद, चंद्रशेखर दातखिळे, भगवान थोरवे, नीरा थोरवे, धनंजय गोपाळे, राहुल गरुड, साधना पऱ्हाड, बाप्पू खैरे, सुरज साळुंखे, वैजनाथ यादव, विजय खाडे यांसह आदी उपस्थित होते, यावेळी बोलताना विजय जातीचा नाय तर आमच्या हक्काचा होता असे सांगत ज्यावेळी संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील या रस्त्याने जातील त्यावेळी त्यांचा मोठा सन्मान करणार असल्याचे दत्ता कवाद व भगवान थोरवे यांनी सांगितले.





शिक्रापूर (ता. शिरुर) येथे आरक्षणाचा विजयोत्सव साजरा करताना समाज बांधव. (छायाचित्र आकाश भोरडे)

द•ख•ल

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी प्रवेश अर्ज वेळापत्रक जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासनाच्या वसतीगृह प्रवेशाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. मात्र या योजनेपासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांना पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजना तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना अंतर्गत प्रवेशाची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी निश्चित वेळापत्रकानुसार ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विोद लोंढे यांनी केले आहे. १२ वी नंतर व्यावसायिक पदवी व पदव्यूत्तर (बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शासनाच्या https://hmas.mahait.og या संकेतस्थळावर १ ते १८ सप्टेंबर २०२५ दरम्यान अर्ज सादर करावेत. ही योजना विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासात आर्थिक व शैक्षणिक पाठबळ ठरणारी असल्याने पात्र विद्यार्थ्यांनी वेळ न दवडता अर्ज दाखल करावेत, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

वेळापत्रक पुढीलप्रमाणे :

अर्ज सादर करण्याची मुदत : १ ते १८ सप्टेंबर २०२५ अर्ज छाननी : १९ ते २४ सप्टेंबर २०२५ पहिली निवड यादी जाहीर : २५ सप्टेंबर २०२५ पहिल्या यादीस प्रवेशाची अंतिम तारीख : ६ ऑक्टोबर २०२५ दुसरी निवड यादी जाहीर : ९ ऑक्टोबर २०२५दुसऱ्या यादीस प्रवेशाची अंतिम तारीख : १७ ऑक्टोबर २०२५

## शेतकऱ्यांना तुती लागवड व रेशीम उद्योगासाठी आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्हा रेशीम कार्यालयामार्फत 'रेशीम विभाग आपल्या दारी' ही मोहीम १ ते १५ सप्टेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येत आहे. या मोहिमेत दोन वर्षांपूर्वी नोंदणी करूनही तुती लागवड न केलेल्या शेतकऱ्यांना थेट घरी भेट देत माहितीपत्रक वाटप केले जाणार असून, रेशीम उद्योग सुरू करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे, अशी माहिती रेशीम विकास अधिकारी यांनी दिली. रेशीम उद्योगासाठी तुती लागवड महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून केली जाते. मनरेगा योजनेतून तुती लागवडीचा लाभ तहसील कार्यालय, पंचायत समिती व कृषी विभागामार्फत मिळू शकतो. गावातील किमान पाच शेतकऱ्यांनी ग्रामसभेच्या संमतीने ग्रामरोजगार सेवकाच्या मार्गदर्शनाखाली नोंदणी केली तर योजनांचा लाभ घेता येतो. मनरेगा योजनेतून एक एकर तुती लागवडीसाठी तीन वर्षांत एकूण २ लाख १२ हजार ७८४ रुपये मंजूर होतात. तसेच रेशीम कीटक संगोपनगृह उभारणीसाठी मजुरी स्वरूपात ६६ हजार ४५६ रुपये व साहित्यासाठी १ लाख ५३ हजार रुपये मिळून एकूण ४ लाख ३२ हजार २४० रुपये मदत तीन वर्षांत उपलब्ध होते.अल्पभूधारक शेतकऱ्यांशिवाय इतर शेतकऱ्यांसाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र २ योजना आहे. यामध्ये तुती लागवडीसाठी ४५ हजार रुपये, सिंचनासाठी ४५ हजार रुपये, संगोपनगृह उभारणीसाठी २ लाख ४३ हजार ७५० रुपये, साहित्यासाठी ३७ हजार ५०० रुपये व निर्जंतुकीकरणासाठी ३ हजार ७५० रुपये काम पूर्ण झाल्यानंतर मिळतात.दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या पावसाळ्यात तुतीच्या १० कोटी वृक्षांची लागवड करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले असून त्यातील ४ कोटी वृक्ष लागवडीचे लक्ष रेशीम संचालनालयाला देण्यात आले आहे. यापैकी अहिल्यानगर जिल्ह्यास २२ लाख वृक्ष (४०० एकर) लागवडीचे उद्दिष्ट निश्चित झाले .आहे.

## एचआयव्ही एड्सविषयी जिल्ह्यात जनजागृती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** एचआयव्ही/ एड्सविषयी समाजात अजूनही गैरसमज, भीती आणि कलंक आहे. त्यामुळे जनजागृती वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेच्या पुढाकाराने संपूर्ण राज्यात इंटेन्सिफाइड अवेअरनेस कॅम्पेन राबविले जात आहे. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगरमार्फत ही मोहीम सुरू असून यासाठी सर्व एकात्मिक समुपदेशन व चाचणी केंद्र (खउढउ), संपूर्ण सुरक्षा केंद्र, एआरटी केंद्र आदींच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे.ही मोहीम १२ ऑगस्टपासून सुरू झाली असून १२ ऑक्टोबरपर्यंत चालणार आहे. दरम्यान १०५ गावे, ३०५ शाळा व ७५ महाविद्यालयांमध्ये उपक्रम राबविण्याचे नियोजन आहे. आतापर्यंतच्या तीन आठवड्यांत ५७ गावे, १०३ शाळा, २९ महाविद्यालये व २१ झोपडपट्टी परिसरांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे.

## सोनईतील अंमळनेर शिवारात स्थानिक गुन्हे शाखेचा छापा; सुमारे दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कडक कारवाईचे आदेश पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिल्यानंतर, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने सोमवारी (दि. १ सप्टेंबर) सोनई पोलीस ठाणे हद्दीत मोठी कारवाई केली. या कारवाईत अंमळनेर शिवारातील जोरे वस्ती येथून प्रतिबंधित मावा व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त करण्यात आला असून, १.५४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करत आरोपीस अटक करण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या



मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. राहुल डरके, पोना. रिचर्ड गायकवाड, पोना. सोमनाथ झांबरे, पोना. बाळासाहेब नागरगोजे, पोकॉ. रमीझराजा आतार, पोकॉ. प्रकाश मांडगे, पोकॉ. अमोल आजबे या पथकाने ही कारवाई केली. पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून सोनई-नेवासा रोडलगत छापा टाकण्यात आला. छाप्यात सुनिल अण्णासाहेब येळे (वय २८, रा. अंमलनेर, ता. नेवासा) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून सुगंधीत तंमबाखू, तयार मावा, कच्ची सुपारी, मावा तयार करण्याचे मशीन व वजनकाटा असा एकूण १लाख ५४हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोकॉ. अमोल आजबे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी व मुद्देमाल पुढील तपासासाठी सोनई पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे यांच्या सूचनांनुसार व मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## आरक्षणाची लढाई जिंकल्यानंतर शेवगावमध्ये जल्लोष

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अमरापुर :** मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी संघर्षयोध्दा मनोज जरांगे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे गेल्या पाच दिवसापासून सुरु असलेल्या आंदोलनास यश मिळाले. राज्य सरकारच्या वतीने मराठा आरक्षण उपसमितीने पाच मागण्या मान्य केल्याने जरांने यांनी आंदोलकांच्या समंत्तीने उपोषण मागे घेतले. आरक्षणाची लढाई जिंकल्यानंतर सर्वत्र जल्लोष साजरा करण्यात आला. शेवगाव शहरातील क्रांती चौकात सकल मराठा समाजाच्या वतीने डीजेच्या तालावर, गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करुन आनंदोत्सव साजरा केला. संघर्षयोध्दा मनोज जरांगे



हे मराठा बांधवांसह मराठा समाजाच्या आरक्षणासाठी शुक्रवार ता.२९ पासून मुंबई येथील आझाद मैदानावर अमरपण उपोषणास बसले होते. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील व समितीच्या सदस्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपसमुख्यमंत्री अजीत पवार, एकनाथ शिंदे, कायदेशीर सल्लागार, सचिव यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर मंगळवार ता.२ रोजी संघर्षयोध्दा मनोज जरांगे यांच्यासमोर एक जीआर सादर केला. त्यामध्ये जरांगे यांच्या सात मागण्यातील पाच मागण्या मान्य केल्या. त्यानंतर जरांगे यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधून डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते लिंबु शरबत घेवून आंदोलन मागे घेतले.आरक्षणाची लढाई जिंकल्यानंतर सर्वत्र जल्लोष साजरा करण्यात आला.मराठा सेवा संघांचे तालुकध्यक्ष विजयराव देशमुख, दिनेश लव्हाट ( आबा) माऊली खबाले शरद जोशी विक्रमराव दारकुंडे सर्जेराव तानवडे किशोर पवार संतोष भुसारी महेश फलके विजय पवार अजिंक्य लांडे गोविंद लांडे वैभव पवार योगेश लांडे सिद्धार्थ काटे शितल पुरनाळे दिपक शेडे काका घुले डॉ. नितीन सातपुते गणेश शहाणे सुरेश लांडे योगेश बोडखे अमोल भवर समीर शेख रवी डोके अमोल तहकीक बाबा गाढे नारायण ढगे अविनाश देशमुख शंकर मामा लांडे ॲडआकाश लव्हाट, अजिंक्य लव्हाट, अक्षय झिरपे संभाजी ब्रिगेड चे तालुकाध्यक्ष लक्ष्मण गायकेशेवगाव शहरामध्ये ही सकल मराठा समाजाच्या वतीने क्रांती चौकामध्ये डीजेच्या तालावर, गुलालाची उधळण व फटाक्यांची आतषबाजी करुन आनंदोत्सव साजरा केला. यावेळी सकल मराठा समाज शेवगाव,आदी येथील मनोकामना गणपती येथील पेढे देऊन सर्व सकल मराठी बांधवाना एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

## जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार सचिन ठाणगे यांना जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळी ढोकेश्वर:**दरवर्षीप्रमाणे ५ सप्टेंबर शिक्षक दिनाच्या दिवशी उत्कृष्ट काम करणाऱ्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक व केंद्रप्रमुख यांना ''जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्काराने'' गौरविण्यात येते. या वर्षी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धोत्रे खुर्द येथील उपक्रमशील शिक्षक सचिन बबनराव ठाणगे यांना त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल' जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ ' जाहीर करण्यात आला आहे.सचिन ठाणगे हे पारनेर तालुक्यातील तिखोल येथील रहिवाशी असून दुर्गम आणि ग्रामीण भागातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेत कार्यरत हेत.शाळेमध्ये पहिली ते चौथी इयत्तेपर्यंत वर्ग असून मेंढपाळ व्यवसाय करणाऱ्या पालकांची मुले शिक्षण घेतात. विद्यार्थ्यांना शाळा हे आपले दुसरे घरच वाटावे यासाठी मिशन आपुलकी उपक्रमांतर्गत लोकसहभागाच्या माध्यमातून वेगवेगळ्या कल्पना राबवून शाळेचे 'बालउद्यान' तयार केले .त्यामुळे शाळेत येणारा विद्यार्थी आनंदाने येतो. टाकावू वस्तूंचा परिपूर्ण वापर करून शाळेचा कायापालट केला आहे.त्यामुळे शैक्षणिक शॉर्ट फिल्म , प्री विडींग सारख्या शुटींग या ठिकाणी होतात. आजपर्यंत ही शाळा पाहण्यासाठी आजी - माजी लोकप्रतिनिधी , निवृत्त शिक्षक बांधव , विविध वरिष्ठ अधिकारी, परिसरातील शिक्षक - पालकांसह इतर जिल्ह्यातील शिक्षण प्रेमींनी शाळेला भेटी दिल्या आहेत . या शाळेचा पटाचा आलेख दरवर्षी वाढतच आहे.सतरा विद्यार्थी संख्या असणाऱ्या शाळेचा पट आज पन्नासच्या पुढे घेवून जाण्यासाठी या शिक्षकाचे कार्य खूप महत्वाचे आहे. अल्पावधीतच नावारुपाला आलेल्या या शाळेमध्ये शहरी भागातील शाळेंच्या बरोबरीचे शिक्षण दिले जात असल्याने , इंग्रजी माध्यमाच्या प्रवेशाबरोबरच इतर जिल्हयातील



विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले आहेत.लोप होत चाललेली शिवकालीन ' मोडी 'भाषेचे ज्ञान स्वतः अवगत करून ते मुलांना दिले ,याची दखल जिल्हाधिकारी 'सिद्धराम सालिमठ ' यांनी स्वतः घेवून विद्यार्थी व शिक्षकाचा गौरव केला आहे.विदयार्थ्यांना अभ्यासाची गोडी लागावी म्हणून यूट्यूबच्या माध्यमातून जर्मन भाषेचे ज्ञान मुलांना दिले .या उपक्रमाची दखल महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री ' दादाजी भुसे ' यांनी घेवून शिर्डी येथे झालेल्या शैक्षणिक कार्यशाळेत शाळेचा व शिक्षकाचा नामोल्लेख करून गौरोद्गगार काढले. अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी पंकज आशिया यांनी ' ग्रामीण भागातील समस्या आणि उपाय ' या विषयावरील दिल्ली येथील कार्यशाळेतील मार्गदर्शनासाठी जिल्ह्यातून सचिन ठाणगे यांची निवड केली होती .'' ग्रामीण भागातील धोत्रे खुर्द शाळेचे नाव जिह्यातच नव्हे तर जिल्ह्याबाहेर घेवून जाणाऱ्या शिक्षकाचा आम्हाला अभिमान आहे.'' असे उद्गगार आमदार काशिनाथ दाते व खासदार निलेश लंके यांनी काढले. वापरून आपल्या कामाचा ठसा उमठवणारे सचिन ठाणगे यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मुख्यकार्यकारी अधिकारी आनंद भंडारी ,शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, जयश्री कार्ले ,गटशिक्षणाधिकारी कांतिलाल ढवळे ,विस्तार अधिकारी चांगदेव गवळी, उत्तम फंड ,ग्रामस्थ,जिल्ह्यातील सर्व शिक्षक संघटनासह शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अशा विविध क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

## शेअरमार्केट मध्ये फसवणूक प्रकरणी गुन्ह्याची व्याप्ती वाढली आतापर्यंत २५ जणांवर गुन्हा, तीन अटक

**दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** :ालुक्यात विविध कंपन्यांच्या माध्यमातून शेअरमार्केटमध्ये गुंतवणूक करा आणि दरमहा भरघोस परतावा मिळावा या गोड प्रलोभना खाली अनेकांची फसवणूक करण्यात आली असून याप्रकरणी दाखल असलेल्या गुन्ह्यात आरोपीची संख्या २५ पर्यंत पोहचली असून अजूनही आरोपीची संख्या वाढणार असल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे . श्रीगोंदा,कर्जत,पारनेर तालुक्यात नेहमी नाव बदलणाऱ्या कंपन्यांमध्ये सीस पे,इन्फिनिटी बिकन,ट्रेंज इन्व्हेस्टमेन्ट प्रा लि तसेच मास्टर सिनर्जी अश्या विविध कंपनीमध्ये शेअर मार्केटमध्ये लाखाची गुंतवणूक करा, आणि दरमहा ६ ते ८ टक्के परतावा मिळावा या प्रलोभनाखाली लाखो रुपयांची फसवणूक करण्यात आल्या, प्रकरणी नितीन अंबादास गांगर्डे रा मांदळी, ता कर्जत यांच्या फिर्यादीवरून श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यावर तालुक्यातील रंगनाथ तुळशीराम गलांडे रा देऊळगाव तसेच अनिल झुंबर दरेकर रा हिरडगाव यांना ७ जुले रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आल्यावर तपासाची चक्रे फिरू लागली आणि दि २८ ऑगस्ट रोजी सायंकाळी यामध्ये तिसरी पांडुरंग किसन खामकर मूळ रा . पारगाव सुद्रिक ता श्रीगोंदा याना सनसिटी वडगाव शेरी पुणे येथून अटक करण्यात आली आहे. आतापर्यन्त फसवणुकीची रक्कम १कोटी ९५लाख ८९हजार ९९९ वरती जाऊन पोहचली असून तब्बल २५ आरोपी करण्यात आले आहेत .अजूनही आरोपीची संख्या वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही यामध्ये आतापर्यंत नवनाथ जगन्नाथ औताडे रा फळवणी ता माळशिरज सोलापूर, अगस्त राहुल मिश्रा रा नांदेडसिटी पुणे,राहुल शामराव काळोखे रा दिघी पुणे,गौरव देविदास सुखदीवे रा अकोला,प्रसाद प्रकाशराव कुलकर्णी रा नांदेडसिटी पुणे,सचिन लक्ष्मण खडतरे रा करकुंभ ता पंढरपूर जिल्हा सोलापूर,ययाती राहुल मिश्रा रा वाघोली पुणे,शुभम नवनाथ औताडे रा फळवणी ता माळशिरज सोलापूर,सुवर्णा नवनाथ औताडे रा फळवणी ता माळशिरज सोलापूर,रंगनाथ तुळशीराम गलांडे रा देऊळगाव तसेच अनिल झुंबर दरेकर रा हिरडगाव ता श्रीगोंदा,प्रसाद बाजीराव देशमुख रा भोसरी पुणे,हेमंत बाबासाहेब चव्हाण रा सतरानळी हडपसर पुणे,पांडुरंग किसन खामकर मूळ रा पारगाव सुद्रिक ता श्रीगोंदा,विनोद बबन गाडीलकर रा माळवाडी ता पारनेर अहिल्यानगर,बाळू रमेश तांगडे रा मोशी पुणे,विजयमाला सचिन साखरे रा चिखली पुणे,नागनाथ उमाकांत गोरे रा मोशी पुणे,उमा अशोक पवार रा वेलापूर ता माळशिरज सोलापूर,रोहन रमेश शिंदे रा माळवाडी ता मान जिल्हा सातारा,सौरभ गणेश वायचळ रा बार्शी सोलापूर,विनायक ज्ञानेश्वर मराठे कुरुळी पुणे,स्वाती रंगनाथ गलांडे रा हिरडगाव ता श्रीगोंदा,चेतन सुनिल धर रा गुरगाव हरियाणा असे एकूण २५ जनावर गुन्हा दाखल करण्यात आला. असून तिघांना अटक करण्यात आली आहे तर तब्बल २२ जण अजूनही फरार आहेत. त्यांचा पोलीस कसून शोध घेत आहेत तसेच यामध्ये अपहाराची रक्कम तसेच आरोपीची संख्या अजूनही वाढणार असल्याची माहिती आर्थिक गुन्हे शाखेच्या वतीने देण्यात अली आहेत. अनेकजण अटके जवळ असल्याची चर्चा श्रीगोंदा तालुक्यातील शहरी आणि ग्रामीण भागात सर्वात जास्त गुंतवणूक करण्यात आली होती. त्यासाठी एका शिक्षण संस्थेतील शिक्षक शिपाई यांच्यासह अनेक एजन्ट कार्यरत होते त्याच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची फसवणूक झाली असून त्याचीही नावे लवकरच आरोपीच्या यादीत येणार असल्याची खात्रीलायक माहिती मिळत असून त्याचे अटकपूर्व करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरु असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे .

## श्रीगोंद्यात कागदी, प्लास्टिक कपवर बंदी कधी ?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** शहरी भागासह ग्रामीण भागात चहाच्या टपरीवर पेपर अथवा प्लास्टिकच्या कपमधून चहा दिला जातो. त्यामुळे कॅन्सरसारख्या अजारांना आमंत्रण मिळत असल्याचा संशोधकांचा दावा आहे. त्यामुळे अशा कपमध्ये चहा पिणे टाळावे, असा सल्ला वैद्यकीय अधिकारी देत आहेत. तरीही त्याचा खुलेआम वापर सुरु आहे. राज्य सरकारकडून सिंगल यूज प्लास्टिकच्या काही वस्तूंवर सध्या बंदी आहे. नियमानुसार १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांनादेखील वापरास बंदी आहे. केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने २०२१ मध्ये अधिसूचित केलेल्या सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०२१ अनुसार सिंगल यूज (एकल वापर) प्लास्टिकच्या काही वस्तूंना प्रतिबंध करण्यात आलेला आहे. मात्र, सध्या श्रीगोंद्यातील बाजारपेठांमध्ये प्लास्टिक पिशव्यांचा वापर सर्रास होत आहे.भाजी, फळ आणि किराणा मालाचे विक्रेते यांच्या कडून नागरिकांना प्लास्टिक पिशव्यामध्ये साहित्य दिले जात आहे. त्यामुळे श्रीगोंदा शहरवासीयांबरोबरच ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. चहा हा सर्वांच्या आवडीचे पेय. थकवा दूर करण्याच्या अनुषंगाने अनेकजण वेळी-अवेळी टपरीवर हॉटेलात चाप पितात. मात्र चायटपरी, हॉटेलमध्ये कागदी व प्लास्टिकच्या कपचा वापर केला जात असल्याचे बरेच ठिकाणी बघायला मिळते. मात्र अशा कपचा वापर करणे धोकादायक आहे.याच्या माध्यमातून नागरिकांच्या जीविताशी खुलेआम खेळ सुरु असतानाही प्रशासन बघ्याची भूमिका घेत असल्यामुळ नागरीकातून ग्रामीण भागातील ग्रामपंचायत प्रशासन तसेच शहरी भागातील नगरपरिषद प्रशासनाच्या कामकाजावर मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होताना दिसत आहे दंडाची रक्कम मोठी, तरीही दुर्लक्ष बंदी असलेल्या प्लास्टिकचा पहिल्यांदा वापर करताना आढळल्यास दुकानदाराकडून पाच हजार रुपये इतका दंड आकारला जात आहे. दुसऱ्यांदा २० हजार तर तिसऱ्यांदा आढळल्यास २५ हजार रुपये इतका दंड वसूल केला जात आहे. दंड करूनही प्लास्टिकचा वापर केला जात असल्याचे दिसून येत आहे.कप धोकायदायकच ! कागदापासून बनवलेले कप सुरक्षित ठेवण्यासाठी कार्बडिझम कीटकनाशक- बुरशीनाशक वापरले जाते. गरम चहा, कॉफी आदी कपमध्ये टाकल्यावर त्यात रसायने विरघळून पेयांसह शरीरात प्रवेश करण्याचा धोका असतो. त्यामुळे कर्करोगाचा धोका वाढतो.असेही वैद्यकीय अधिकाऱ्यांचे मत असतानाही याचा वापर श्रीगोंद्यात खुलेआम असल्यामुळे सगळीकडेच नागरिकांच्या जीविताशी खुलेआम खेळ सुरु आहे

## रुक्मिणी बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** ;- तालुक्यातील श्री रुक्मीणी सहकारी बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली असून बँकेचे व्हा. चेअरमन सुरेश रावसाहेब गावडे यांनी बँकेचा आर्थिक व सांपत्तिक स्थितीचा आढावा सभेसमोर सादर करत बँकेचा विस्तार संपूर्ण महाष्ट्राभर करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यामुळे बँकेच्या कामाची पारदर्शकता जनतेच्या समोर मांडण्यात आल्याने नागरिकांतुन एक आगळावेगळा विस्वास व्यक्त केला जात होता. श्री रुक्मिणी सहकारी बँक लि., श्रीगोंदा या बँकेची २९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमन वसंतराव बापूराव गुंड यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील तुळशीदास मंगल कार्यालय येथे पार पडली. बँकेचे व्हा. चेअरमन सुरेश गावडे यांनी बँकेचा आर्थिक व सांपत्तिक स्थितीचा आढावा सभेसमोर सादर केला. त्यानंतर बँकेचे चेअरमन वसंतराव गुंड यांनी बँकेची वाटचाल ही बँकेचे दिवंगत चेअरमन स्व. विठ्ठलराव (नाना) बापूराव गुंड यांच्या आदर्श कार्यपद्धतीनुसार सुरु असून आपली बँक ही सभासद, ठेवीदार व ग्राहकांच्या हित जोपासत असल्याचे सांगितले व बँकेचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्र राज्य करण्यात आले असल्याचे नमूद केले. तसेच त्यांनी सभेसमोर माहिती देताना दि. ३१मार्च अखेर आर्थिक वर्षासाठी बँकेच्या रु. २१५ कोटी ४५ लाख एवढ्या ठेवी असून रु. १२४ कोटी ४९ लाख कर्जवाटप आहे. बँकेचे एकुण खेळते भांडवल रु. २६४ कोटी ०२ लाख, राखीव व इतर निधी रु. ३३ कोटी २७लाख, गुंतवणूक रु. १२१ कोटी १६ लाख, एकुण व्यवसाय हा ३३९ कोटी ९४ लाख व भांडवल पर्याप्तता प्रमाण (उठअठ) हे २६.३६ टक्के आहे. तसेच दि.३१ मार्च अखेर आपल्या बँकेस आयकर व इतर तरतुदी वजा जाता निव्वळ नफा रु. ३ कोटी ०७ लाख व बँकेने निव्वळ एन.पी.ए.चे प्रमाण शून्य टक्के राखले असल्याचे नमूद केले. त्यामुळे बँकेची आर्थिक स्थिती ही भक्कम असल्याचे सांगितले. त्याचबरोबर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता बँकेस वैधानिक लेखापरीक्षण ''अ'' वर्ग प्राप्त झालेला आहे. बँकेच्या मुख्य कार्यालयासहित अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यामध्ये एकुण अकरा शाखा कार्यान्वित आहेत. तसेच बँकेने खातेदारांसाठी ए.टी.एम., फोन पे, मोबाईल बँकिंग व इतर डिजिटलायझेशन सेवा कार्यान्वित केलेल्या आहेत, ह्या सर्व सेवांचा ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन बँकेचे चेअरमन वसंतराव गुंड यांनी नमूद केले. सदर वार्षिक सभेत सालाबादप्रमाणे बँकेच्या सभासदांना १२टक्के प्रमाणे लाभांश जाहीर करण्यात आला. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेचे कामकाज संपल्यानंतर बँकेच्या सर्व सभासदांना बँकिंग विषयावर महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे संचलित सहकार प्रशिक्षण केंद्र. अहिल्यानगर यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात आले. बँकेचे वार्षिक सर्वसाधारण सभेमधील सर्व विषय सर्वानुमते मंजुर करण्यात आले व स्नेह भोजनाने बँकेच्या वार्षिक सभेची सांगता करण्यात आली.

## नान्नज प्रकरणात दुसरी फिर्याद दाखल, दहा जणांविरोधात गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड** - आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या कुटुंबातील सदस्यांवर प्राणघातक हल्ला केल्याच्या प्रकरणातील आरोपी वैभव साबळे याने सुनील साळवे यांच्यासह दहा जणांविरोधात जामखेड पोलिस स्टेशनला फिर्याद दाखल केली आहे. नान्नज प्रकरणात परस्परविरोधी दुसरी फिर्यादी दाखल झाली आहे. २४ ऑगस्ट रोजी रात्री आरपीआयचे जिल्हाध्यक्ष सुनिल साळवे यांच्या कुटुंबातील सदस्यांवर एका टोळक्याकडून सशस्त्र हल्ला करण्यात आला होता. या प्रकरणात ७ जण जखमी झाले होते. या प्रकरणी जामखेड पोलिस स्टेशनला १४ जणांविरोधात खुनाचा प्रयत्न करणे आणि अ‍ॅट्रोसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. घटनेनंतर या प्रकरणात वैभव साबळे सह एकुण ६ आरोपींना आज अखेर अटक करण्यात आली आहे. पोलिस कोठडीत असलेल्या वैभव साबळे याने सुनिल साळवे यांच्यासह १० जणांविरोधात फिर्याद दाखल केली आहे. वैभव विजय साबळे याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २४ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास मी व माझा मित्र अभय राजे भोसले असे दोघेजण साईनाथ पानटपरी वर बसलो होतो. त्यावेळी आमच्या गावातील दिग्वीजय आबु सोनवणे हा पानटपरीजवळ आला आणि तो अभय सोबत भांडु लागला. त्यावेळी मी त्या दोघाचे भांडण सोडवले. त्यानंतर दिग्विजय याने यशदिप संपत साळवे यास फोन करुन बोलावुन घेतले. त्यावेळी यशदीप सोबत अभिजित संपत साळवे, सतिष अजिनाथ साळवे, अरविंद भालेराव, सद्दाम पठाण, आदर्श साळवे हे सर्वजण हातात कोयता, लोखंडी गज, बांबु असे घेऊन आले. दिग्विजय याच्या सांगण्यावरुन अभय राजे भोसले यास मारु लागले. त्यावेळी मी सोडवासोडव करत असताना अभिजित संपत साळवे यांने त्याचे हातातील कोयत्याने माझ्या पाठीवर मारले. तसेच अरविंद भालेराव याने माझे मांडीवर कोयता मारला. तसेच आदर्श सुनिल साळवे याने पाठीवर कोयता मारला. तसेच सद्दाम पठाण याने माझे खिशातील २ हजार रूपये व सतिष साळवे याने माझ्या गळ्यातील सोन्याची चैन भांडणात काढुन घेतली असावी. त्यानंतर त्याचे घरातील महिला आल्या व माझे पानटपरीवर दगड फेकायला चालु केले. त्यावेळी मी व अभय राजे तेथून निघुन गेलो. त्यानंतर काही वेळाने मी टपरीवर पाहीले असता माझे टपरीमधील फ्रिज, मोबाईल व इतर साहीत्याची नासधुस झालेली दिसली. तसेच मी माझ्या काउंटरच्या गल्ल्यात ठेवलेली रोख रक्कम ४ हजार रुपये मला दिसुन आले नाही. त्यानंतर मी घरी गेलो असता माझे वडीलांनी मला सांगितले की, सुनिल साळवे हा हातात बंदुक घेउन आला होता. व अभिजित साळवे हा कोयता घेऊन आला होता. रतन साळवे हा हातात बांबु घेऊन घरासमोर आरडाओरडा करत होते व मला मारणार असे म्हणुन शिवीगाळ करत होते. त्यानंतर ते सर्वजण त्यांच्या बोलेरो गाडीत निघुन गेले. त्यानंतर मी माझ्या वडीलांच्या मोबाईल फोन वरुन डायल ११२ ला भांडण झाले असे फोन करुन सांगितले होते, असे फिर्यादीत नमुद आहे. ३१ ऑगस्ट रोजी वैभव साबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन यशदिप साळवे, अभिजीत साळवे, सतिष साळवे,अरविंद भालेराव, आदर्श साळवे,सद्दाम पठाण, सुनिल साळवे, अभिजीत साळवे, रतन साळवे, शिवानी साळवेशा दहा जणांविरोधात विविध गंभीर कलमान्वये जामखेड पोलिस स्टेशनला गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदर प्रकरणाचा पुढील तपास जामखेड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली नान्नज पोलीस दुरक्षेत्राचे पोलीस हे.कॉ. संजय लोखंडे हे करत आहेत.

## राष्ट्रवादीच्या युवक अध्यक्षपदी राहुल ढाकणे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी:**राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या पाथर्डी तालुका युवक अध्यक्षपदी राहुल विष्णू ढाकणे यांची निवड करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्याचे कोषाध्यक्ष तथा आ. शिवाजीराव गर्जे यांच्या हस्ते ढाकणे यांना युवक जिल्हाध्यक्ष संतोष धुमाळ यांच्या सहीचे नियुक्तीपत्र देण्यात आले.यावेळी बोलताना आमदार गर्जे म्हणाले,मला स्वतःला या मतदारसंघात निवडणूक लढवायची नसली तरी कार्यकर्त्यांना ताकद देण्याची भूमिका घेऊन आपण काम करत आहोत.राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्ष संघटनेत ज्येष्ठांबरोबरच तरुणांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे.यापुढील काळातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कडून मोठ्या प्रमाणात तरुणांना संधी दिली जाणार आहे.तळागाळात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारधारा पोहोचविण्यासाठी तरुणांचे मोठे योगदान राहणार आहे.

आमदार शिवाजीराव गर्जे यांच्यासह पक्षश्रेष्ठींनी दिलेल्या संधीच सोनं करून दाखवेल असा विश्वास यावेळी नवनियुक्त अध्यक्ष राहुल ढाकणे यांनी व्यक्त केला.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते भीमराव फुंदे,तालुकाध्यक्ष रणजीत बेळगे,महिला अध्यक्ष मनीषाताई डांभे,तालुका सरचिटणीस श्रीकांत खेडकर ,शुभम दहिफळे अजित पालवे,कैलास दराडे यासह मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
गुरुवार, दि.४ सप्टेंबर २०२५ | अहिल्यानगर | पान नं. ८

## श्रीरामूरचे गणेश दर्शन



बेलापूर रोडवरील लक्ष्मी आई मंदिर परिसरातील बजरंगनगरचा राजा



श्रीरामपूर नगरपालिका विद्युत रोषणाई



श्रीरामपूरचा चिंतामणी गणेश उत्सव मंडळ




कचेरी रोड येथील श्रीरामपूरचा राजा



कुंभार गल्ली श्री संत गोरोबा काका मित्र मंडळ



सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आझाद मैदान (छाया-अमोल कदम, श्रीरामपूर)

# जादा परताव्याचे आमिष; १.६० कोटींची फसवणूक

## १५ जणांविरुद्ध तोफखाना पोलिसांत गुन्हा

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : जादा परताव्याचे गोडवे गाऊन तब्बल १ कोटी ६० लाख रुपयांची गुंतवणूकदारांची फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इनफिनाईट बिकन इंडिया प्रा. लि. आणि ट्रेड्स इन्व्हेस्टमेंट प्रा. लि. या कंपन्यांनी '१० ते १२ टक्के परतावा' मिळेल, असे आमिष दाखवून गुंतवणूकदारांना गंडवले. या प्रकरणी शिक्षिका सौ. अनामिका दिलीपराव शिंदे (३८, रा. भगवान बाबा चौक, निर्मलनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून १५ जणांविरुद्ध तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्हा न्यायालयाच्या आदेशानंतर पोलिसांनी हा गुन्हा नोंदवला असून तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक कल्पना चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### सुरुवातीला विश्वास, नंतर मोठा गंडा

अनामिका शिंदे यांना त्यांच्या मैत्रिणीकडून या कंपन्यांची माहिती मिळाली. परताव्याचे आमिष दाखवून कंपनीचे सीईओ अगस्त मिश्रा, संचालक राहुल काळोखे, गौरव सुखदेव, प्रसाद कुलकर्णी, सचिन खडतरे, चेतन धर, नवनाथ औताडे, ययाती मिश्रा, शुभम आवताडे, विनोद गाडीलकर, विनायक मराठे, प्रसाद देशमुख, हेमंत चव्हाण, संदीप दरेकर आणि पांडुरंग खामकर यांनी विश्वास संपादन केला.

सौ. शिंदे यांनी स्वतः ९ लाख ५० हजार रुपयांची गुंतवणूक केली, तर त्यांच्या नातेवाईक व मित्रांनी एकत्रित १ कोटी ६० लाखांची रक्कम कंपनीच्या विविध खात्यांमध्ये गुंतवली. सुरुवातीला कंपनीने वर्षभर परतावा दिला. मात्र फेब्रुवारी २०२५ पासून परतावा आणि मुद्दल देणे कंपनीने थांबवले.

### क्रिप्टोकरन्सीचा फंडा

दरम्यान कंपनीने आपले वेबसाइट पोर्टल तीन वेळा बदलले. गुंतवणूकदारांना तुमचे पैसे क्रिप्टो करन्सीमध्ये वर्ग केले आहेत असे सांगण्यात आले. मार्च-एप्रिल २०२५ मध्ये 'विड्रॉल' बटणाद्वारे रक्कम काढण्याचा प्रयत्न केला असता, कोणालाच पैसे मिळाले नाहीत. पुण्यातील कार्यालय गाठले असता ते बंद असल्याचे दिसून आले.

यामुळे फसवणुकीचा संशय बळावला. अखेर सौ. शिंदे यांनी जिल्हा न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाने ३० ऑगस्ट २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिल्यानंतर पोलिसांनी कारवाई केली.

या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी दाखल केलेल्या गुन्ह्यात १५ आरोपींचा समावेश असून, तपास सखोल केला जात आहे. गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करून सुरूवातीला परतावा देणे आणि नंतर अचानक सर्व व्यवहार बंद करण्याची ही पद्धत पॉन्झी स्कीमसारखी असल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

# सरकारी वाहनावर मिरवणूक काढणे अंगलट येणार?

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा** : सध्या सगळीकडे गणेश उत्सवाची धामधूम सुरू असून गणेशाला निरोप देण्यासाठी जंगी मिरवणुकीची तयारी करण्यात आली अशीच एक मिरवणूक श्रीगोंदा पोलीस स्टेशनकडून काढण्यात आली होती त्यामध्ये चक्क श्रीगोंदा पोलीस ठाण्याच्या सरकारी वाहनावर गणपतीची मिरवणूक काढण्यात आल्याने नागरिकांमधून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त केला जात आहे.

श्रीगोंदा पोलीस ठाणे कायम वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत राहिले असून आज त्यात भर पडली आहे .श्रीगोंदा पोलिसांनी पोलीस ठाणे परिसरात बसवलेल्या गणपतीची चक्क सरकारी वाहनावरून पारंपरिक वाद्याच्या तालासुरात वाजवत गाजत नाचत मिरवणूक काढली होती. सरकारी वाहनातून मिरवणूक काढल्यामुळे पुन्हा एकदा पोलिसावर टीकेची झोड पडली आहे , या मिरवणुकीसाठी संबंधित सरकारी खात्याकडून किंवा प्राधिकरणाकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असते,ती घेतली होती का ? मिरवणूक सार्वजनिक नियमांचे उल्लंघन करणारी नसेल. अशा मिरवणुकीसाठी 'मिरवणूक परवानगी' किंवा 'समारंभ परवानगी' अर्ज करणे आवश्यक असते. मात्र हे पोलिसांना लागू नाही का? अश्या विविध चर्चेला उधाण आले होते श्रीगोंदा पोलीस काही विशिष्ट लोकांसाठी काम करतात की काही विशिष्ट धर्माचे आहेत का? विशिष्ट धर्माचा प्रचार करण्यासाठी काम करतात उद्या बुद्ध पौर्णिमेला तसेच ईदला पण अशीच मिरवणूक काढणार का? असा प्रश्न उपस्थित करत यासारख्या अनेक प्रश्नांनी श्रीगोंदा पोलीस ठाण्यातील परिसर कुजबुजत असताना पाहण्यास मिळाला मात्र खुद्द पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्यासह त्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्या साक्षीने हा सर्व कार्यक्रम सुरु होता मात्र पोलिसांनी चक्क सरकारी वाहनावर गणपती बसून नाचत त्याचे गणपती विसर्जन केले आहे. या परवानगीसाठी त्यांनी कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांची परवानगी घेतली होती का ? आमचेही उत्सवाची पोलीस मिरवणूक काढणार का ?असे अनेक प्रश्न उपस्थित करत कारवाई करण्याची मागणी जोर धरताना दिसत आहे

### सरकारी वाहनावर मिरवणूक काढणे चुकीचे ?

जसा गुन्हेगाराला कोणताही धर्म जात नसते तसेच पोलीस खात्याला जात नसते. अथवा धर्म नसतो त्यामुळे श्रीगोंदा पोलिसांनी सरकारी वाहनावर मिरवणूक काढणे चुकीचे आहे. या सबंधी सखोल चौकशी करून दोषीवर कडक कारवाई करण्यात येईल अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीण लोखंडे यांनी बोलताना दिली आहे .

**प्रवीण लोखंडे,**
**(उपविभागीय पोलीस अधिकारी)**

# महापालिकेच्या चार घंटागाड्यांसह सात ड्रायव्हर-हेल्पर बेपत्ता

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : महानगरपालिकेसाठी कचरा उचलण्याचे काम करणार्या श्रीजी एजन्सी (अहमदाबाद, गुजरात)च्या तब्बल २० लाख रुपयांच्या चार घंटागाड्या आणि त्या गाड्यांवर काम करणारे सात ड्रायव्हर व हेल्पर बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांचा तपास सुरू आहे.

फिर्यादीनुसार, कंपनीत मॅनेजर म्हणून काम करणारे सतीश साहेबराव शिरसाठ (रा. बुरूडगाव रस्ता, जहागीरदार चाळ, अहिल्यानगर) यांनी दिलेल्या माहितीनुसार कंपनीने २०२३ मध्ये चार घंटागाड्या खरेदी केल्या होत्या. मात्र त्यांची नोंदणी अद्याप आरटीओकडे झालेली नव्हती.गेल्या १० महिन्यांपासून या गाड्यांवर मध्यप्रदेशातील ब्रिजेश सारेण, नुरा बारभोर, बबलु बारभोर, अरविंद अमलीयार, बुरा बारभोर, संजु मेढा व कमील कटारा हे सात जण ड्रायव्हर व हेल्पर म्हणून काम करत होते. हे सर्वजण दररोज सकाळी सात वाजता कचरा संकलनाचे काम सुरू करून सायंकाळी पाचच्या सुमारास गाड्या अहिल्यानगर-दौंड रस्त्यावरील सागर शिंदे यांच्या मोकळ्या जागेत पार्क करून तेथेच मुक्काम करत होते.मात्र, सोमवारी (१ सप्टेंबर) संध्याकाळी गाड्या नेहमीप्रमाणे पार्क करण्यात आल्या. मात्र दुसऱ्या दिवशी सकाळी गाड्या आणि संबंधित सर्व ड्रायव्हर-हेल्पर बेपत्ता झाल्याचे लक्षात आले. सुपरवायझर अक्षय निकम व सागर ढुमणे यांनी परिसरात शोध घेतला, मात्र गाड्या व संबंधित इसमांचा कुठेही मागमूस लागला नाही.या प्रकारामुळे कंपनीला मोठा आर्थिक फटका बसला असून, महापालिकेच्या कचरा संकलनाच्या कामात देखील अडथळा निर्माण झाला आहे. या प्रकरणी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# महिलेवर कोयत्याने वार; गुन्हा दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नंदिनी शिंदे ह्या दूध आणण्यासाठी जात असताना आरोपीने त्यांना रस्त्यात अडविले. आणि शिवीगाळ करुन त्यांच्यावर कोयत्याने वार केले. तसेच त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांना बांबूने व लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. ही घटना राहुरी तालुक्यातील टाकळीमियॉ येथे दि. २ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास घडली.

नंदिनी अमोल शिंदे, वय ३४ वर्षे, ह्या राहुरी तालुक्यातील शिंदे वस्ती, टाकळीमियॉ, येथे राहत असून त्यांच्या शेजारी परिघाबाई कौशीनाथ शिंदे हे त्यांच्या कुंटुंबासह राहवयास आहे. याच्यासोबत नेहमी वाद होत असतात. त्या बाबत नंदिनी शिंदे यांनी १ सप्टेंबर रोजी राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानंतर दि. २ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजेचे सुमारास नंदिनी शिंदे ह्या दुध आणण्यासाठी जात होत्या. तेव्हा आरोपींनी त्यांना रस्त्यात अडवले व म्हणाले कि, ह्या रस्त्याने गेलीस तर तुझे कोयत्याने मुंडके तोडण्यात येईल. तेव्हा नंदिनी शिंदे त्यांना म्हणाल्या कि, हा सामाईक रस्ता आहे, मी येथुनच जाणार. तेव्हा आरपींनी नंदिनी शिंदे यांच्या डोक्यात कोयता मारुन त्यांना जखमी केले. तसेच त्यांच्या कुटुंबातील इतर लोकांना बांबू, बॅट व लाथा बूक्क्यांनी मारहाण केली. तसेच या रस्त्याने गेली तर तुला जिवे ठार मारून टाकीन, अशी धमकी दिली.

घटनेनंतर नंदिनी अमोल शिंदे यांनी राहुरी पोलिस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून आरोपी सुरेखा कौशीनाथ शिंदे, परिघाबाई कौशीनाथ शिंदे, ओंकार काकासाहेब शिंदे, साईनाथ काकासाहेब शिंदे, काकासाहेब कौशीनाथ शिंदे, सर्व रा. शिंदे वस्ती, टाकळीमियॉ, ता. राहुरी, यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# राजुरमध्ये बेकायदा पेट्रोल-डिझेल साठा

## ६ लाख ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : अवैध धंद्यांवर अंकुश ठेवण्यासाठी पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेने (ङ.उ.इ.) अकोले तालुक्यातील राजुर येथे छापा टाकून बेकायदा पेट्रोल व डिझेल साठा उघडकीस आणला. या कारवाईत ६ लाख ४१ हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एक आरोपीला अटक करण्यात आली, तर एक जण फरार आहे.

गुप्त माहितीच्या आधारे पथकाने वारंघुशी (ता. अकोले) येथे छापा टाकला. आरोपी पांडुरंग लक्ष्मण सदगीर (वय ४०) यांच्या घरासमोर प्लॅस्टिक ड्रममध्ये अवैध रित्या पेट्रोल-डिझेल साठवलेले आढळले. चौकशीत सदगीर हा साठा नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी तालुक्यातील पाडळी येथील लक्ष्मण उर्फ पांडु तानाजी घोंगडे याच्याकडून कमी दराने खरेदी करत असल्याचे निष्पन्न झाले.

कारवाईदरम्यान पोलिसांनी पेट्रोल-डिझेलने भरलेले सहा प्लॅस्टिक ड्रम तसेच महिंद्रा बोलेरो कंपनीची मालवाहू पिकअप वाहन असा एकूण ६लाख ४१हजार ३७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. आरोपी पांडुरंग सदगीरला अटक करण्यात आली असून दुसरा आरोपी लक्ष्मण घोंगडे फरार आहे.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस नाईक राहुल कचरु डोके यांच्या फिर्यादीवरून राजुर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेला मुद्देमाल व अटक आरोपी राजुर पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व त्यांच्या पथकाने केली.

# प्रेरणाच्या आठव्या शाखेचा आज शुभारंभ : वाबळे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**





**राहुरी** : प्रेरणा पतसंस्थेची आठव्या शाखेचा शुभारंभ आज ब्राह्मणीत होत आहे. शाखेचा उद्घाटन सोहळा आज गुरुवारी सकाळी साडेनऊ वाजता ब्राह्मणी बाजारतळ येथे होणार असल्याची माहिती पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे यांनी दिली.

प्रेरणा पतसंस्थेच्या या शाखेचा शुभारंभ माजी नगरविकास व उर्जा राज्य मंत्री प्राजक्त तनपुरे यांच्या हस्ते होणार आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था रावसाहेब खेडकर यांची प्रमुख उपस्थिती आहे.प्रेरणा पतसंस्थेच्या ठेवी सव्वाशे कोटी रुपये असून कर्ज वितरण ७७ कोटी रुपये झाले आहे . प्रेरणाचे ३२ व्या वर्षात पदार्पण झाले असून या पतसंस्थेचे वीस वर्षांपूर्वी संगणकीकरण झालेले आहे .कोअर बँकिंग ते सर्व बँकिंग सुविधा ब्राह्मणीत उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत . संस्थेचे मोबाईल प देखील आहे. या सर्व बँकींग सुविधा ब्राह्मणी सारख्या बाजारपेठेत ग्राहकांना उपलब्ध होत आहेत.ग्राहकांची अनेक वर्षांची अडचण आता दूर होणार असल्याचे सुरेश वाबळे यांनी सांगितले. संस्थेच्या या आधी गुहा ,म्हैसगांव, तांभेरे ,राहुरी ,आंबी व श्रीरामपूर येथे शाखा आहेत.वांबोरी नंतर लगेचच ब्राह्मणी येथे शाखा सुरु होत असून देवळाली प्रवरा येथेही लवकरच नवीन शाखा कार्यान्वित होणार असल्याचे व्हा. चेअरमन मच्छिंद्र हुरुळे यांनी सांगितले.

# बीडमध्ये किरकोळ वादातून मित्रानेच संपवले मित्राला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

बीड : शहरातील महाराणा प्रताप चौकात मंगळवारी मध्यरात्री एका किरकोळ वादातून एका तरुणाची हत्या झाली आहे. विजय काळे (वय ३०, रा. धारूर) असं मृत तरुणाचं नाव आहे. त्याच्याच मित्राने छातीत चाकूने वार केल्याने त्याचा मृत्यू झाला. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय काळे आणि त्याचा मित्र मंगळवारी रात्री महाराणा प्रताप चौकात एकत्र होते. त्यांच्यात काही किरकोळ कारणावरून वाद सुरू झाला. हा वाद इतका विकोपाला गेला की, आरोपी मित्राने रागाच्या भरात विजयच्या छातीत चाकूने वार केले. विजयच्या डाव्या बाजूला गंभीर जखम झाली. घटनेनंतर विजयला तात्काळ जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा केला. शिवाजीनगर पोलिसांनी तात्काळ दखल घेऊन पुण्यातील फरार आरोपी अभिषेक राम गायकवाड याचा शोध घेण्यासाठी वरिष्ठ आदेशान्वये पोलिसांनी चार पथक नेम वेगवेगळ्या ठिकाणी पाठवून दोन पथकांनी रात्रभर शोध घेऊन आरोपी अभिषेक राम गायकवाड हा काकडहिरा तालुका पाटोदा जिल्हा बीड या शिवारात डोंगरामध्ये दबा धरून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली सदर पोलिसांनी त्याचा शोध घेत पळून जात असताना शिताफीने त्यास डोंगरदऱ्यात शोधून अटक केली. सदरची कारवाई पोलिस अध्यक्ष नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी उपविभाग बीड हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास मोरे यांनी या कामी परिश्रम घेतले. पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# नगर-मनमाड महामार्गावरील चार दिवसात तिसरा बळी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : नगर मनमाड महामार्गावर काल काल सायंकाळच्या वेळी राहुरी खुर्द येथील मुळा पाटबंधारे विभागाच्या मुख्य गेटसमोर झालेल्या अपघातात सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालया चे निवृत्त शिक्षक प्रकाश दत्तु साबळे (वय ६५ ) यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची लाट व्यक्त करण्यात येत आहे. तर या आदी सोमवारी सकाळी राहुरी कृषी विद्यापीठ परिसरात साडेआठच्या सुमारास अहिल्यानगर दिशेने जात असलेल्या कंटेनरने दुचाकीस्वारास पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात ज्ञानदेव पाटीलबा बलमे (वय ३१, रा. वडनेर, ता. राहुरी) या तरुणाच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने तो तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

प्रकाश साबळे हे आपले सहकारी शिक्षक डोके सर यांच्या समवेत महात्मा फुले कृषी विद्यापीठाहून आपल्या घरी जात असताना राहुरीकडून अहिल्या नगरच्या दिशेने जात असणारा कंटेनर क्र.आर जे १४ जी.टी. ००६९ याने जोराची धडक दिल्याने त्यांचा जागेवरच मृत्यु झाला. तर ज्ञानदेव बलमे सोमवारी हा तरुण अहिल्या नगर येथे ड्युटी साठी जात असताना हा दुर्दैवी अपघात घडला. रस्त्याला जागोजागी मोठा मोठा खड्डे पडले असल्याने दुचाकी स्वराने आपला वेग कमी केला असता कंटेनर चालकाच्या धडकेमध्ये तो तरुण रस्त्यावर पडून त्यांच्या डोक्यावरून कंटेनरचे चाक गेल्याने त्या तरुणाचा घटनास्थळीच मृत्यू झाला.अवघ्या ३१ व्या वर्षी या तरुणावर काळाने घाला घातल्याने त्यांच्या कुटुंबावर व परिसरावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



गेल्या चार दिवसात राहुरी ते विद्यापीठ ह्या रस्त्याच्या अपघातात तीन बळी गेल्याने जनतेमध्ये मोठा संताप व्यक्त होत आहे. त्यामुळे नगर-मनमाड महामार्ग आणखी किती बळी घेणार ? असा प्रश्न सर्वसामान्य नागरिक प्रशासनाला करीत आहेत. प्रशासनाने या महामार्गावर रस्त्यांची दुरुस्ती करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत.

अपघात झाल्यानंतर रस्त्याच्या दोन्ही बाजुंनी वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडल्याने गावातील ज्ञानदेव तोडमल, गणेश भांड, प्रशांत डोळस, नितीन पाटील, नंदकुमार डोळस, उध्दव पवार, विजय आळपे, मनोज साळवे, दिपक राऊत, कारखाण्याचे माजी संचालक नंदकुमार डोळस यांसह अनेक तरुण पुढे सरसावल्याने वाहतूक सुरळीत झाली.